| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २९६ वा | बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# राज्यसभा निवडणुकीचे बिगुल वाजले!

## राज्यातील ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान

***मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय निवडणूक आयोगाने (दि. १८) राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, यामध्ये महाराष्ट्रातील ७ जागांचा समावेश आहे. महाराष्ट्रासोबतच ओडिसा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील रिक्त होणाऱ्या १६ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.*

**महाराष्ट्रातील 'या' नेत्यांचा कार्यकाळ संपणार**

महाराष्ट्रातून राज्यसभेवर गेलेले सात महत्त्वाचे सदस्य निवृत्त होत असल्याने या जागा रिक्त होत आहेत. यामध्ये शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस (श.प. गट)), रामदास आठवले (आरपीआय – भाजप मित्रपक्ष), फौजिया खान (राष्ट्रवादी काँग्रेस (श.प. गट)), रजनी पाटील (काँग्रेस), प्रियांका चतुर्वेदी (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे), धैर्यशील पाटील (भाजप), भागवत कराड (भाजप)

**रामदास आठवलेचं निश्चित; शरद पवारांच्या निर्णयाकडे लक्ष**

राज्यातून राज्यसभेवरील कार्यकाळ संपलेल्या रामदास आठवले यांचे पुन्हा राज्यसभेत येणे निश्चित मानले जाते, तर शरद पवार पुन्हा राज्यसभेत येणार का याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

प्रियंका चतुर्वेदी आणि फौजिया खान यांच्या पक्षाकडे त्यांना पुन्हा राज्यसभेत पाठवण्यासाठी पुरेसे संख्याबळ नाही. काँग्रेस नेत्या रजनी पाटील इतर राज्यातून राज्यसभेवर येणार का आणि भागवत कराड, धैर्यशील पाटील यांच्या बाबतीत भाजप काय भूमिका घेणार याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**मतदानासाठी जांभळ्या स्केच पेनचाच वापर करणे बंधनकारक**

मतदानासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या विशेष जांभळ्या स्केच पेनचाच वापर करणे बंधनकारक असेल असे आयोगाने स्पष्ट केले आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २० मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.



### असा आहे निवडणूक कार्यक्रम

**अर्ज भरण्याची अंतिम तारीख : ५ मार्च २०२६वृत्तपत्र सदस्यता**
**अर्जांची छाननी : ६ मार्च २०२६**
**अर्ज मागे घेण्याची मुदत : ९ मार्च २०२६**
**मतदान दिनांक : १६ मार्च २०२६ (सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत)**
**मतमोजणी : १६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेपासून**

# विमान आदळून भीषण स्फोट व्हावा म्हणून अतिरिक्त इंधन साठा

## रोहित पवारांचा खळबळजनक दावा



**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. हा अपघात नसून घातपात आहे, असा दावा त्यांचे पुतणे रोहित पवार यांनी केला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी अनेक प्रश्न मांडले होते. तर आजच्या पत्रकार परिषदेत त्यांनी पुरावेच सादर केले आहेत. यातून त्यांनी अनेक शंकाही निर्माण केल्या आहेत. तसंच, विमानात इंधनाचा अतिरिक्त साठाच होता, त्यामुळे विमानाचा भीषण स्फोट झाला, असाही दावा त्यांनी केलाय.

२०२३ मध्ये जो विमान अपघात झाला, त्याचे विमान मोठं होतं. हे विमान रनवेवर पडले होते. रनवे डांबरी होता. पण दादांचं विमान साईडला पडलं. जर बॉल फरशीवर टाकला तर बाऊन्स जास्त होतो, पण मातीत टाकला तर कमी बाऊन्स होतो. तसेच, दादांचे विमान रनवेवर पडले नाही, त्यामुळे त्याची वेलोसिटी कमी होती. मग स्फोट का झाला? त्यामुळे त्यात अधिकचे फ्युएल टँक होते, म्हणून स्फोट झाला ही आमची शंका खरी होत आहे. हे फ्युएल टँक टॉयलेटच्या बाजूला असतात. त्याच्याच मागच्या बाजूला (पंखांच्या इथे) ब्लॅक बॉक्स असतो, असे रोहित पवार म्हणाले.

या पंखांत टँक फुल भरला होता. हे विमान सुरतहून मुंबईमार्गे बारामतीला आलं होतं. बारामतीहून पुन्हा हैदराबादला जाणार होते. त्यामुळे हैदराबादला जाऊनही इंधन भरता आले असते. पण टँक पूर्णपणे भरून म्हणजेच तीन हजार लीटर इंधन भरून विमान बारामतील नेण्यात आलं. याचं कारण काय? पायलटचा वापर करून घातपात झाला असावा, त्यात फ्युएल जास्त असल्याने मोठा स्फोट होईल अशी शंका खरी होताना दिसते आहे. हा फ्लाइट प्लान आहे. पण डीजीसीएला ते फ्लाईन प्लान कळवला नव्हता, असं रोहित पवार म्हणाले.

## राज ठाकरे भेटीसाठी एकनाथ शिंदेंच्या घरी; राजकीय वर्तुळात खळबळ!

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. ठाण्यातील नंदनवन बंगल्यावर एकनाथ शिंदेंची भेट घेतली. महापनगरपालिकांच्या निवडणुकीनंतर पहिल्यांदाच राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांची भेट झाली. यावेळी एकनाथ शिंदे आणि राज ठाकरेंमध्ये विविध विषयांवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. राज ठाकरे आणि एकनाथ शिंदेंच्या या भेटीमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत उज्वल यश

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर व्दारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी ठाकूर दत्ता दिगंबरसिंग (९५.०७ पर्सेंटाइल), दीक्षित वारद वसंत (८९.५१ पर्सेंटाइल), शिंदे वेदांत वसंत (८८.४६ पर्सेंटाइल) आणि जाजे वैष्णवी शिवकुमार (८१.४७ पर्सेंटाइल) यांनी जेईई मेन्स (पहिले सत्र) परीक्षेत घवघवीत गुण संपादित करून उज्वल यश संपादन केले आहे.



हे सर्व विद्यार्थी सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. आमच्या महाविद्यालयात घेण्यात आलेल्या नियमित तासिका, नियमित सराव परीक्षा आणि त्यातील अडचणी व उपाय योजना, संस्था पदाधिकारी, आई-वडील, प्रभारी प्राचार्य, मुख्य समन्वयक, पर्यवेक्षक, सीईटी सेल मुख्य समन्वयक, बोर्ड समन्वयक आणि विज्ञान शाखेचे सर्व शिक्षक यांच्या मार्गदर्शनामूळे हे उज्वल यश प्राप्त झाले आहे अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

त्यांनी मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, सीईटी मुख्य समन्वयक प्रा. वनिता पाटील, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, स्टाफ सचिव, विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## आयटीआयच्या दोन लाख विद्यार्थ्यांना मिळणार आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**मुंबई/प्रतिनिधी :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यातील दोन लाख आयटीआयच्या विद्यार्थ्यांना टप्याटप्याने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा दीर्घ अनुभव असलेल्या 'अनिरुद्धाज् अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट' आणि कौशल्य विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय यांच्यात आज यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सशक्त भारत घडवण्यासाठी देशवासियांसाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. योग दिन, खेलो इंडिया याचाच हा भाग आहे. तर राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागाकडून ही पारंपरिक खेळांचे महत्व नव्या पिढीला पटवून देण्यासाठी राज्यभरातील आयटीआयमध्ये क्रीडा महाकुंभ ही आयोजित करण्यात येतो. आता याच शृंखलेत जनसेवेच्या भावनेतून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राबवून देशसेवेचे काम आयटीआयमध्ये होत असल्याचे प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी केले. कोणतीही आपत्ती ही सांगून येत नसते, आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, अशा वेळी मानवी सुरक्षेला प्राधान्य देऊन यामध्ये युवांचा सहभाग वाढवून जिल्हा आपत्ती व्यवस्थापनला सहकार्य होण्यासाठी आपत्ती बचावकार्य करणारी यंत्रणा तयार करता येईल. आपत्तीचे व्यवस्थापन आणि बचावकार्य याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकांनी घेतले पाहिजे, असेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

## प्रभात किरणे

विहीर कोरडी न भागे
तहान संत विचारा विना
वाढे अज्ञान ढोंगी साधू
संतांचा गवगावा जन
कर्मकंडात,काळजी जीवा
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**अजित पवार यांच्या मृत्यूची सीबीआय चौकशीची मागणी...**

## चिमटा दयाचा



लातुरातील अप्रिय घटनेची लातुरकरात नाराजी निर्माण होत आहे ! खाकी व खादीची वर्दीची वचक वाढविण्याची गरज आहे !!

# सिध्देश्वर यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन




**लातूर/प्रतिनिधी :** श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सव पार पडत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अंतर्गतच यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम व देवस्थानचे प्रशासकीय अधिकारी सचिन जांबूतकर यांच्या हस्ते करण्यात आले.


सिध्देश्वर यात्रा महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक व मनोरंजनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याच बरोबर शेतकजयांसाठी विविध उपक्रमही या यात्रेदरम्यान राबविण्यात येतात. जिल्हा कृषी विभागाच्या वतीने या यात्रा महोत्सवाचे औचित्य साधून यात्रा परिसरात शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाची उभारणा करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज मंगळवार दि. १७ रोजी करण्यात आले आहे. हा उद्घाटन सोहळा जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, उपाधिक्षक सूर्यकांत लोखंडे, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, कृषी अधिकारी आर. आर. येवले, विशाल झांबरे, अजित देशमुख, विनायक बारबोले, महादेव घुले अमोल बनसोडे यांची उपस्थित होती.

या माहिती कक्षाच्या माध्यमातून आधुनिक शेती तसेच उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी राबविण्यात येणारे नवनविन प्रयोग याबाबत माहिती शेतकजयांना देण्यात येणार आहे. त्याचबरोबर कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी शेती कशी करावी याबाबतची माहिती अवगत करण्यात येणार आहे. सदर कक्ष सकाळी १० ते संध्याकाळी ६ या दरम्यान सुरु राहणार असून याठिकाणी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थित राहणार आहे. या कक्षाचा लाभ जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकजयांनी घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग व देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# देशपातळीवर लातूरचा डंका; रिलायन्स लातूर पॅटर्न व श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचा JEE Main सत्र-१ मध्ये घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यात गुणवत्तेची परंपरा जपणाऱ्या Reliance Latur Pattern व श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, लातूर यांनी यावर्षीही अभूतपूर्व यश संपादन करत महाराष्ट्रातील सर्वोत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे.

NTA द्वारे घेण्यात आलेल्या गएए चरळप २०२६ परीक्षेच्या पहिल्या सत्रात (दि. २१ ते २८ जानेवारी २०२६) देशभरातून सुमारे १४.५० लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धात्मक परीक्षेतून दि. १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्राप्त निकालानुसार महाविद्यालयातील खालील विद्यार्थी प्रतिष्ठित IIT-JEE -dvanced परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.




यामध्ये चि. श्रीनिवास अजमेरा यांनी ९९.०५ पर्सेन्टाइल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर चि. ह्रिदयांश सोनी (९८.५७ पर्सेन्टाइल) यांनी द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

तसेच चि. सोहम भरोसे (९८.११), चि. सक्षम सोनवणे (९७.९९), चि. ओम लाडेकर (९७.२३), चि. अनमोल खरे (९५.५७) चि. अथर्व जामगडे (९५.१५), चि. देवानंद निकम (९४.६४), कु. स्नेहा ढमाले (९४.३७), चि. श्रेयश दंडनाईक (९३.३२), कु. प्रांजल कांबळे (९२.२५), कु. प्रणाली कुंभार (९१.४७) आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेची शिस्तबद्ध शैक्षणिक पद्धत यांचा मोठा वाटा आहे. इयत्ता दहावीमध्ये अत्यंत सामान्य गुणवत्ता असतानाही अवघ्या दोन वर्षांत देशपातळीवर यश संपादन करणे हीच 'लातूर पॅटर्न'ची खरी ओळख असल्याचे संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव यांनी सांगितले.

यावेळी संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या मा. सुलक्षणा केवळराम मॅडम, कोषाध्यक्ष मा. प्रेरणा होनराव, कार्यकारी संचालक श्री. ओंकार होनराव अकॅडेमिक प्रमुख प्रा. संगम खराबे, प्रा. सुनील कुमार वर्मा, प्रा. जितेंद्र कुमार, प्रा. विकास कुमार सोनी, प्रा. मांगीलाल चौधरी, प्रा. रोहित यादव, प्रा. मयंक कुमार, प्रा. सतिष पाटील, प्रा. प्रसाद कुलकर्णी, प्रा. मीरा मुंडे व सर्व प्राध्यापकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रिलायन्स लातूर पॅटर्न – शाश्वती आदर्श शिक्षणाची !

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारत घाबरणारा नाही

भारत हा अमेरिकेला घाबरला नाही तर हिंमतीने तोंड देत आहे. अमेरिकेचे ट्रम्प यांनी टेरिफ लादले ते भातरला परवडणारे नव्हते. त्यामुळे भारताने जशास तसे उत्तर दिले. भारतात अनेक वस्तू ज्या आयात करीत होतो तो बनविण्यास जनतेला प्रवृत्त केले. अशा स्थितीत भारतातील विरोध पक्षाने मोठी टिका केली. त्या टिकेला सत्ताधाऱ्यांनी न जुमानता यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रमाणे भारतीयांना अशा संकटातून मार्ग काढण्यासाठी समोरे जाण्याचे आवाहन केले. देशातील नागरिकांनी साथ दिली. त्यानंतर अमेरिकेने भारताशी व्यापारी संबंध दृढ केले यावर ही विरोधक टिका करीत आहेत. भारत पुर्वीपासून स्वयंपुर्ण आहे, भारत अनेक पदार्थाची निर्यात करीत होता. भारतात सर्व काही पिकते. फळ व फुले निर्यात होतात. ईलेक्ट्रॉनिक बाबतीत भारत काही प्रमाणात मागे आहे. भारतीय विद्यार्थी हे जगात आहेत. आयटी क्षेत्रात मोठी कामगिरी करीत आहेत. त्यामुळे जगात भारतीयांची कामगिरी प्रशांसनिय आहे. अमेरिकेत भारतीय विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. भातीयांची एक वसाहत अमेरिकेत आहे. त्यामुळे भारतीयांना कमी समजणे योग्य नाही. भारताचा इतिहास हा गौरवशाली आहे. जे शोध आता लावले जात आहेत ते वैदिक काळात उपयोगात आणले जात होते. राईट बंधुंनी नाही तर तळपदे बंधुंनी विमानाचा पहिला शोध लावला. मानसाची उत्पत्ती ही माकडापासून नाही हा डार्विनचा सिद्धांत वैदिक काळातच खोडला गेला. रामायण हे महाभारताच्या अगोदर घडले आहे. या रामायानच्या काळातील युद्धाची माहिती घेतली पाहिजे. सेतूपुल समुद्रात बांधला त्यावेळी इंजिनियर किती प्रगत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील वास्तूकला आजही मानसाला मार्गदर्शन करतात. उंचावर पाणी घेवून जाणे किंवा उंचावर मोठी दगड-धोंडे घेवून केवळ दगडाचे बांधकाम आजच्या काळात शक्य नाही. मुळात सध्याला भारतीय हे चुकीचे तातडीने अनुकरण करतात. मारूतीला देव मानतो. हनुमानाचे मंदिर अनेक ठिकाणी आहेत. त्याला शेपटी दाखविली जाते. ती अतिषय चुकीची आहे. वनात जंगलात राहाणारा, शुद्ध संस्कृतचे ज्ञान असणारा, बलशाली हनुमान होते. त्यांच्याकडे हवेत उडण्याची कला होती. हनुमान हा बलशाली होता म्हणून तो लंकेत जावून रावणाला आव्हान दिले होते. त्यांच्या बाबत विविध संभ्रम पसरविले जातात. हनुमान माकड नव्हता. हे लक्षात घेतले पाहिजे. डार्विनचा सिद्धात हा अयोग्य आहे. वैदिक काळातील काही बाबीचा विचार केला तर कळून येतील. दुसरी एक बाब वास्को द गामा बाबत बोलतो. त्याने भारताचा शोध लावला नाही उलट त्याने भारतातील सोन्याची लुट केली आहे. सोने लुटून घेवून गेला तरी भारतात सोन्याचे मंदिर होते. सोमनाथ मंदिर सोन्याचे होते. अनेक मंदिरावर कळस हे सोन्याचे होते. मुलामा हा सोन्याचा होता. असा भारताचा इतिहास असताना नको त्या चुकीच्या बाबी पसरविल्या जातात. मुळात इतिहासाचा अभ्यास नाही. वैदिक साहित्याचे वाचन नाही. त्यामुळे गैरसमजुतीने काही बाबी घडत आहेत. भारत हा देश कोणाला घाबरत नाही. उलट काही भाग शेजारी राष्ट्राला दिला. भारताने अनेक राष्ट्राला मदत केली. भूप्रदेशाबाबत आजही शंका व चिंता व्यक्त केली ही भारतीयांची चुक आहे. त्यामुळे भारत हा कोणालाही घाबरत नाही. अमेरिकेला नाही ना चीनला नाही. पाकिस्तानला तर घाबरत नाही. काही क्षणात पकिस्तान होता का नव्हता अशी स्थिती करण्याची ताकद भारतीय सैन्यात आहे हे विसरून चालणार नाही. भारतीयांनी जर आपले कर्तव्य व काम व्यवस्थित केले तर अमेरिका डवचणार नाही. आपले कुटीर उद्योगास चालना दिली पाहिजे. शेती हा भाततीयांचा मुळ व्यवसाय आहे. शेतीत जनावरे मोठ्या प्रमाणात पुन्हा निर्माण करावी लागणार आहे. एकीकडे जनावरे कमी व दुध व्यवसायात भरारी दिसून येते. अतिरिक्त दुध येते कोठून तर, रासायनिक प्रक्रियाकरून आरोग्यास घातक असणारी दुधाची निर्मिती केली जाते हा प्रकार अनेकदा पकडला गेला आहे. शेतीकडे वरचेवर दुर्लक्ष होत गेल्याने परिणाम हा वाईट झाला. शेती हा व्यवसाय म्हणून याकडे पाहिले पाहिजे. त्याच प्रमाणे यात नुकसान होत नाही झाले तर बरोबरी होते. स्पर्धेच्या युगाकडे पाहून शेती केली तर मोठ्या प्रमाणात लाभ होवू शकतो. दुसरे आपले आरोग्य सदृढ ठेवायाचे झाले व शुद्ध हवेतचा उपभोग घ्यावयाचा झाला तर शेतीशिवाय पर्याय नाही. रासायनिकमुक्त फळे व अन्नधान्यासाठी शेती ही केली पाहिजे. शेतकऱ्यास ॲटक आला असे दिसून येत नाही. बँकेत काम करणारे, व्यापारी, कोंदट स्थितीत काम करणारे आदिंना दुर्धर रोगाचा धोका निश्चित दिसून येतो. शेतकऱ्यास नाही कारण तो स्वच्छंद दुनियेत वावरत असतो. दुध, फळे, अन्न हा रायायनिक मुक्त खात असतो. त्यामुळे निरोगी जीवनासाठी आपला भारतीयांनी आपला मुख्य व्यवसाय शेती हा प्रमाणिकपने केला पाहिजे. तरच भारतीय कदापी उपाशी मरणार नाहीत. भारतीय तसे कलाकार आहेत. काही ही करतील मात्र जीवन यशस्वी जगतील. आलिकडे काही पाश्चमात्य संस्कृतीचा परिणाम भोगावा लागत आहे. त्याच प्रमाणे भारतीयांची सस्कृती उच्च कोटीचे असताना पाश्चमात्यांच्या संस्कृतीच्या स्विकारण्याने जीवन भ्रष्ट होत आहे. रिलेशनशीपच्या नावाखाली किळसवाना प्रकार पाहावयास मिळत आहे. भारतीय ताकद पाहून अमेरिका हा आतून घाबरत आहे. तो बोलेल. तो डवचण्याचा प्रयत्न करेल मात्र प्रत्यक्षात कारवाईचे धाडस करणार नाही. भारत हा शक्तीशाली देश आहे याचा अर्थ भारतातील नागरिक हे शक्तीशाली व पराक्रमी आहेत हे मान्यच केले पाहिजे. ट्रम्पला कितीही टेरिफची घोषणा केली तरी ती परत घ्यावी लागणार आहे. काही प्रमाणात परत घेतली आहे. भारतीयांना बाहेरचा कोणी नमविणार नाही तर देशांतर्गत घटना घडविल्यातर खिळखिला होवू शकेल. भारतीय हे राम, हनुमान व श्रीकृष्णाची वंशज असल्याने कोणालाही घाबरण्याचे कारण नाही. भारतीय बलशाली व पराक्रमी आहेत. हे मान्यच केले पाहिजे. त्याच प्रमाणे देशांतर्गत काही चुकीची मंडळी नको तो वाद उकरून काढून देशात चुकीचा संदेश पसरवित आहेत. त्यालाच नागरिकांनी प्रतिबंध घातला पाहिजे.

महाकाल प्रतिष्ठान व रामलिंगेश्वर देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने

## खंडेरायाचा हळदी व विवाह सोहळा उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** महाकाल प्रतिष्ठान, लातूर यांच्या वतीने व रामलिंगेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ फ ब्रुवारी रोजी श्री खंडेरायाचा हळदी सोहळा तर १५ फेब्रुवारी रोजी भव्य विवाह सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्याने लातूर शहरात भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

गावभागात अति श्रद्धेने पूजले जाणारे बाबा महाकाल हे नगर भ्रमणासाठी वर्षातून केवळ महाशिवरात्रीच्या दिवशीच बाहेर आणले जातात. या दिवशी निघणाऱ्या पालखी सोहळ्याचे गावभागातील नागरिक मोठ्या भक्तिभावाने स्वागत करतात. जणू महाकाल महाराज आपल्या प्रजेच्या हालचाली जाणून घेण्यासाठी आले आहेत, अशा भावनेने नागरिक पालखीचे स्वागत करत दिवाळीप्रमाणे उत्सव साजरा करतात. घराघरांत रांगोळ्या, फुलांची उधळण, दीपप्रज्वलन आणि जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जातो.

यंदाच्या वर्षीही लातूरकरांसाठी ही पर्वणी विशेष उत्साहात साजरी करण्यात आली. पालखी मार्गक्रमण सोहळ्याची सुरुवात लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास अधिक प्रतिष्ठा लाभली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी अशा सोहळ्यांचे महत्त्व अधोरेखित केले.हळदी व विवाह सोहळ्याचा जिवंत देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, डमरू-ताशांचा गजर, वेदमंत्रांचे उच्चारण, फुलांची आकर्षक सजावट आणि भक्तिमय वातावरण यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. खंडेरायाच्या विवाह सोहळ्यातील प्रत्येक विधी अत्यंत पारंपरिक पद्धतीने सादर करण्यात आला, ज्यामुळे उपस्थित भाविकांना जणू प्रत्यक्ष दैवी विवाह सोहळ्याचा अनुभव मिळाला.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे युवक वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग. महाकाल प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांमध्ये सनातन धर्माचे या युगातील महत्त्व पटवून देण्यावर विशेष भर देण्यात येतो. आधुनिक युगातील वेगवान जीवनशैलीत तरुण पिढीने आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहणे, धार्मिक परंपरांचा अभिमान बाळगणे आणि समाजहितासाठी कार्य करणे किती आवश्यक आहे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

भक्तिमार्गातून निर्व्यसनी व संस्कारी जीवन कसे जगता येईल, यावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. व्यसनमुक्ती, शिस्तबद्ध दिनचर्या, वडीलधाऱ्यांचा आदर, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. धार्मिक कार्यक्रम हे केवळ उत्सव नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

महाकाल प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशा धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना योग्य दिशा देण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे. लातूरकरांसाठी हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव ठरला.

## 'एम एस आर टी सी'च्या बस प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड योजना सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) ने प्रवाशांना सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'रुपे ऑन द गो, एनसीएमसी इनेबल्ड' कार्ड योजना राज्यभरात कार्यान्वित करण्यास सुरुवात केली आहे. या कार्डद्वारे सवलतधारक (विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला इ.), विनासवलत प्रवासी आणि सामान्य प्रवासी यांना एकाच कार्डमध्ये प्रवास पास, ऑनलाइन वॉलेट आणि ऑफलाइन वॉलेट उपलब्ध होणार आहे. हे कार्ड वैयक्तिक स्वरूपाचे असून त्यावर व्यक्तीचे नाव आणि फोटोसह माहिती अंकित असेल. हे कार्ड अहस्तांतरणीय असून सवलतीच्या तिकीटासाठी अनिवार्य राहणार आहे. कार्डची नोंदणी आणि वितरण एमएसआरटीसीच्या २५१ आगारातील अधिकृत एजंट, ३३५ वाहतूक नियंत्रण कक्ष तसेच एनएसडीएल पेमेंट बँकेद्वारे नियुक्त होणाऱ्या ३००० पेक्षा अधिक अधिकृत एजंट यांच्यामार्फत होईल. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून नोंदणी पूर्ण झाल्यानंतर साधारण ३० दिवसांत कार्ड वितरित केले जाईल. कार्ड मिळाल्यानंतर पीओएस यंत्राद्वारे सक्रियकरण करावे लागेल. सवलतधारक प्रवाशांना (विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक इ.) या कार्डचा लाभ मिळेल. प्रवासादरम्यान घेतलेले तिकीट सांभाळणे ही प्रवाशांची जबाबदारी राहील. राज्य परिवहन महामंडळाने या डिजिटल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

## माटेगडी येथे शिवजयंती निमित्त शामराव लवांडे यांचे व्याख्यान

**वलांडी /प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त देवणी तालुक्यातील हिसामनगर ( माटेगडी) येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने सुप्रसिद्ध शिवव्याख्याते शिवश्री शामराव लवांडे यांचे ''छत्रपती शिवाजी महाराज आणि आजची युवा पिढी'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान बुधवार, दिनांक, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०७ : ३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळा परिसरात होणार आहे.

शिवव्याख्याते शिवश्री शामराव लवांडे हे लातूर येथील सरस्वती विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख व राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त एक उपक्रमशील शिक्षक असून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि आजची युवा पिढी या विषयावरती महाराष्ट्रभर अनेक व्याख्याने दिली आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वर्तमानपत्रामध्ये लिखाण सुद्धा करतात. तरी या व्याख्यानाचा लाभ सर्व शिवभक्तांनी उपस्थित राहून घ्यावा, असे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती हिसामनगर (माटेगडी) च्या वतीने करण्यात आले आहे.



## देव क्लासेसमध्ये बक्षीस व कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा संपन्न




**निलंगा/आयुब बागवान :** देव क्लासेस आयोजित निलंगा टॅलेंट हंट परीक्षा २०२६ या उपक्रमाचे बक्षीस वितरण तसेच निलंगा शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम निलंगा येथे उत्साहात पार पडला.

दिनांक १ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत शहरातील सर्व शाळांमधील सुमारे १५०० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली, अशी माहिती देव क्लासेसचे संचालक प्रमोट देव यांनी दिली.

बक्षीस वितरण सोहळा सजंयराज हलगरकर(नगरपरिषद अध्यक्ष), भाजपा युवा नेते दत्ता भैय्या मोहलकर तसेच लाल बहाद्दुर शालेचे शिक्षक अतुल शिंदे सर यांच्या हस्ते पार पडला.

कार्यगौरव पुरस्कारांतर्गत महाराष्ट्र विद्यालय चे मुख्याध्यापक मोहन नटवे(शिक्षण), अनिल स्टेशनरी चे संचालक अनिल विभुते(उद्योग), पंढरीनाथ जाधव माजी मुख्याध्यापक शिवाजी विद्यालय (सामाजिक), शिवकुमार बिरादार (उद्योग, दुबई येथे कार्यरत), तसेच तरुण उद्योजक सागर कमलाकर पाटील यांना पुरस्कार देण्यात आले.

हा पुरस्कार कार्यक्रम प्रमुख पाहुणे व वक्ते सचिन जी तायडे आणि फिजिक्स विषय तज्ञ शिक्षक मोहसीन शेख संभाजीनगर यांच्या हस्ते पार पडला.

ही परीक्षा तीन गटात घेण्यात आली होती. गट अ मधून पोदार स्कुलची इयत्ता ४ थी विद्यार्थिनी श्वरा ढोले हिने प्रथम क्रमांक मिळविला. गट ब मध्ये ऐश्वर्या अरसुडे (इयत्ता ७ वी, महाराष्ट्र विद्यालय) हिने प्रथम क्रमांक पटकावला. गट क मध्ये अशोक बाहेती स्कुल ची इयत्ता ९ वी विद्यार्थिनी नंदिनी बिरादार हिने प्रथम क्रमांक मिळविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देव क्लासेसचे संचालक बिरादार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद देव यांनी मानले.

## फ्रिजलाही असते एक्सपायरी, हे संकेत मिळत असतील तर व्हा सावध! होईल मोठे नुकसान



फ्रिज आहे आपल्या आयुष्यातील खूप महत्त्वाचा भाग आहे. हल्ली अन्नपदार्थ साठवण्यासाठी जवळपास सर्वच घरांम ध्ये फ्रिज वापरले जाते. त्याचे तितके जास्त फायदेही आहेत. आपल्याला दीर्घकाळ अन्न सुरक्षित आणि फ्रेश ठेवायचे असेल तर फ्रिज हा उत्तम मार्ग आहे. फ्रिजमध्ये अन्न सुरक्षित राहते, मात्र एका गोष्टीमुळे हेच फायदेशीर फ्रिज तुमचे मोठे नुकसान करू शकते.

घरांमध्ये वर्षानुवर्षे फ्रिज वापरले जाते मात्र त्याचीही एखादी एक्सपायरी डेट असेल हे कुणी फारसे माहित करून घेत नाही. त्यामुळे फ्रिजची कार्यक्षमता बिघडते आणि आपल्याला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. आज आम्ही तुम्हाला फ्रिजची एक्सपायरी डेट कशी ओळखायची आणि त्यामुळे आपल्याला काय तोटे होऊ शकतात याबद्दल माहिती घेणार आहोत.

प्रत्येक रेफ्रिजरेटरचे आयुष्यमान म्हणजेच एक्सपायरी डेट वेगवेगळी असते. अमेरिकेतील सीयर्स होम सर्व्हिसेसच्या अहवालात हे स्पष्ट करण्यात आले. या अहवालानुसार, एक चांगले फ्रिज साधारणपणे १० ते २० वर्षे टिकते. मात्र हे त्याच्या गुणवत्तेवर, तुम्ही त्याची काळजी कशी घेता आणि त्याच्या सभोवतालच्या वातावरणावर अवलंबून असते.

**फ्रिज किती काळ टिकू शकते?**

चांगले फ्रिज साधारणपणे १० ते २० वर्षे टिकते. फ्रिज वरचे फ्रीजर कंपार्टमेंट १० ते १५ वर्षे टिकते. भाज्या, दूध आणि इतर वस्तू साठवण्यासाठी असलेले खालचे कंपार्टमेंट १५ ते २० वर्षे टिकते. तसेच फ्रेंच डोअर रेफ्रिजरेटर १५ ते २० वर्षे टिकतात.

**फ्रिज जास्तकाळ कसे टिकवावे?**

- फ्रिज विश्वासार्ह कंपनीचे आणि चांगल्या दर्जाचा असेल ते जास्त काळ टिकेल. - जर कंडेन्सर कॉइल नियमितपणे स्वच्छ केले गेले तर फीज जास्त काळ टिकते. - फ्रिजवर जास्त भार टाकणे टाळावे आणि ते स्वच्छ ठेवले तर ते जास्त काळ टिकेल. - अति उष्णता किंवा आर्द्रता रेफ्रिजरेटरवर अधिक ताण आणते, ज्यामुळे ते लवकर खराब होऊ शकते.

- फ्रिज सामान्य तापमानात ठेवल्यास जास्त काळ टिकते.

फ्रिज खराब होताना दिसतात हे संकेत - फ्रिज खराब झाले असेल तेव्हा ते जास्त मोठा आवाज करू लागते. - फ्रिज व्यवस्थित साफ केल्यानंतरही त्यातून दुर्गंध येणे ही एक समस्या असू शकते. - फ्रिजचे तापमान स्थिर राहत नसेल. काही भाग गरम राहतो आणि अन्न लवकर खराब होते. वरील सर्व लक्षणं दिसल्यास समजून जा तुमच्या फ्रिजची थंड करण्याची क्षमता कमी होत आहे. या सर्व गोष्टी सूचित करतात की तुमच्या फ्रिजची एक्स्पायरी डेट जवळ येत आहे.

**फ्रिज जास्त काळ टिकवण्यासाठी फॉलो करा या टिप्स**

- तुमच्या फ्रिजचे आयुष्य वाढवण्यासाठी दर सहा म हिन्यांनी त्याचे मागील ग्रिल स्वच्छ करा. - फ्रिजमध्ये जास्त पदार्थ किंवा वस्तू ठेऊ नका. - फ्रिजच्या दरवाजाचे रबर सील सुरक्षित आहे की नाही ते तपासा. - फ्रिज सरळ ठेवा आणि हवा खेळती राहण्यासाठी फ्रिजच्या चारही बाजूंना थोडी जागा सोडा.

## तुम्ही कधी पिलाय का लसणाचा चहा? डायबिटीसपासून ते थायरॉईडपर्यंत मिळतात अनेक फायदे

आयुर्वेदानुसार जर एखाद्या व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असेल तर त्याला आजार होण्याची शक्यता कमी असते. लसूण रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते. लसूण आपण नेहमीच खातो. पण तुम्ही कधी लसणाचा चहा पिलाय का.

लसणाचा चहा रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करते, शिवाय श्वसनाचे संसर्ग दूर ठेवते. दिवसातून एक कप लसणाचा चहा पिल्याने अनेक आजारांपासून आराम मिळेल. त्यामुळेच आपण लसणाच्या चहाचे फायदे जाणून घेऊया..

**सायनससाठी उपयुक्त-**

लसूण केवळ श्वसन संसर्गातच मदत करत नाही तर सायनसच्या समस्या कमी करते. जर तुम्हाला सायनसचा त्रास असेल तर तुम्ही लसूण कुस्करून खाऊ शकता. तसेच आले आणि हळद घालून लसणाचा चहा पिऊ शकता. हा चहा सायनसची समस्या कमी करण्यासाठी खूप फायदेशीर आहे.

**थायरॉईड साठी फायदेशीर-**

शरीरातील थायरॉईड संप्रेरकांमध्ये असंतुलन झाल्यास एखाद्या व्यक्तीच्या समस्या वाढू शकतात. आले आणि लसूण चहा अशा लोकांसाठी खूप प्रभावी आहे. हा चहा थायरॉईड संप्रेरकांचे संतुलन ठेवण्यास मदत करेल.

**डायबिटीस साठी फायदेशीर-**

आजकाल अनेकांना रक्तातील साखरेच्या समस्येचा सामना करावा लागतो. कमी आणि उच्च रक्तदाब दोन्ही गंभीर समस्या बनू शकतात. म्हणून, ज्यांच्या रक्तातील साखर नियंत्रणात नाही त्यांच्यासाठी आले आणि लसूण चहा खूप फायदेशीर आहे.हा चहा रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते.

**मासिकपाळी साठी फायदेशीर-**

मासिक पाळीच्या वेळी अनेक महिलांना पोटात खूपच वेदना होतात. त्यामुळे गरम आले आणि लसणाचा चहा पिल्याने या वेदना कमी होऊ शकतात. या चहाचे गुणधर्म वेदना असलेल्या भागावर शेकसारखे काम करतात. त्यामुळे मासिक पाळीच्या वेदना कमी करते.

**श्वसन समस्या-**

आले आणि लसणाच्या चहामुळे श्वसन समस्या कमी होण्यास मदत होते. आल्यामधील जिंजरॉल आणि लसणातील ॲलिसिन कंपाऊंड श्वसन समस्या कमी करण्यास मदत करतात.



## चांगल्या आरोग्यासाठी सोप्या टिप्स



१. सकस आणि संतुलित आहार: जेवणात फळे, भाज्या, कडधान्ये आणि प्रथिनांचा समतोल राखा २. भरपूर पाणी पिणे: दिवसातून किमान ८-१० ग्लास पाणी प्या, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतील ३. नियमित व्यायाम: दररोज किमान ३०-४५ मिनिटे चालणे, योगा किंवा व्यायाम करा ३, ४. पुरेशी झोप: रात्री ७-८ तासांची शांत झोप घेणे शरीराच्या पुनर्प्राप्तीसाठी (ीश-लेींशिू) आवश्यक आहे ५. घरचे जेवण: बाहेरचे, प्रक्रिया केलेले (ीीलशीीशव) अन्न टाळा आणि ताजे घरगुती अन्न खाण्यावर भर द्या६. सकाळी लवकर उठणे: सकाळी लवकर उठल्याने दिवसभरात फ्रेश वाटते आणि निसर्गाशी जुळवून घेता येते ७. साखर आणि मीठ कमी करा: अति साखरेचे आणि मिठाचे सेवन टाळा, जे हृदयविकार आणि मधुमेहास कारणीभूत ठरू शकतात ८. मानसिक आरोग्य: तणावमुक्त राहण्यासाठी योगा, ध्यान (चशवळींरींळेप) किंवा आवडीचे छंद जोपासा ९. नियमित तपासणी: वर्षातून एकदा तरी संपूर्ण आरोग्य तपासणी करून घ्या १०. व्यसनांपासून दूर राहा: धूम्रपान, मद्यपान यांसारख्या व्यसनांपासून दूर राहणे आरोग्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे


# आपल्या जीवनात जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य असतेच: ओशो

सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले आहेत, जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य आहे. सत्यम, शिवमसोबत परमात्माचे तिसरे वैशिष्ट्य सुंदरम असल्याचे सांगण्यात आले आहे. ते सुंदरच नाही पण सौंदर्यांचा मुळ स्त्रोत त्याचे अस्तित्व, सौंदर्य शाश्वत आहे. जग त्या सौंदर्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन आहे. शाश्वत सौंदर्याचे कलम त्यातूनच प्रस्फुटित होऊन सर्व जड-चेतनात सौंदर्य अभिसिंचन करते. वैदिक दर्शनानुसार रूपम रूपम प्रतिरूपो बभूव म्हणजे प्रकृतीची अव्यक्त अवस्था दर्पण आहे ज्यात चैतन्य ज्योतीचा आभास होतो. जितके मूर्त रूप आहेत ते सर्व त्या परब्रह्मरूपी ज्योतीचे प्रतिबिंब आहेत. त्याच एक परमात्म्याच्या परम ज्योतीने सुर्य व चंद्र प्रकाशमान आहेत. रात्र आपल्या असंख्य नेत्ररूपी ताऱ्यांनी त्या सौंदर्याचे दर्शन करते. परमात्म्याच्या अंश असल्याच्या नात्याने जीवात्मा सुद्धा प्रत्येक सुंदर वस्तुकडे आकर्षित होतो. प्रकृतीचे मनोरम दृश्य, हिरवळ, फुलांचे उद्यान, नदी, पर्वत इत्यादी पाहून कुणाचे मन फुलणार नाही? सौंदर्याकडे आकर्षण अंतरतम्ची अभिव्यक्ती आहे, जी शाश्वत सौंदर्याचा शोध घेते. कबीर त्या शाश्वत सौंदर्याला चोहीकडे पाह-तात- लाली मेरे लाल की, जित देखौं तित लाल। सौंदर्य प्रेमींनी त्या सौंदर्यास नारीत पाहिले व त्यात ब्रह्माची कल्पना केली. असे मधुर व कोमल अवलंबन ब्रह्माव्यतिरिक्त दुसरे कुणीही असू शकत नाही कारण ते प्रेमरूप आहे, परम सुंदर आहे व त्याचे सौंदर्य विश्वाच्या चराचरात आहे. त्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्काराने अज्ञानरूपी अंधार नष्ट होतो, जन्म-जन्माचे पाप धुतले जातात. प्रेम मिळवण्यासाठीच ब्रह्माने सृष्टीची रचना केली व जीवाच्या हृदयात प्रेम निर्माण केले. एकीकडे हे प्रेम साधकाच्या हृदयातील सर्व कलुषित भावना, वासना व आकांक्षा नष्ट करुन हृदय स्वच्छ करते. दुसरीकडे त्याच्या हृदयास त्या अनंत सौंदर्य रसाने परिपूर्ण करते. प्रेम खऱ्या प्रेमीस कधीच थकू देत नाही. ते त्यास नित्य नवीन शाश्वत सौंदर्याची अनुभूती करुन देत राहते.



# विलीनीकरणाची शक्यता मावळली!







उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाच्या धक्क्यातून महायुतीचे नेते आता कुठे सावरत आहेत. अजित पवारांच्या अचानक जाण्यामुळे पोरक्या झालेल्या पक्षाची जबाबदारी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आपल्या खांद्यावर घेतली आहे. अजित पवारांच्या मृत्यूनंतर काही वेगळेच राजकारण सुरू झाल्याचा संशय आल्यामुळे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी घाईघाईने त्यांचा शपथविधी उरकला होता. त्यावरून बरीच टीकाही झाली; पण पक्षाची गरज म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. मागच्या आठवड्यात त्यांनी मंत्रालयात येऊन प्रत्यक्ष कामालाही सुरुवात केली. कदाचित पुढील पंधरा दिवसांत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही त्यांच्याकडे सोपवले जाईल, अशी चिन्हे आहेत.

अजितदादांची जागा कोणीच घेऊ शकणार नाही; पण किमान पक्षातल्या लोकांना धीर देण्यासाठी, त्यांच्या डोक्यातला गोंधळ संपवण्यासाठी पक्षाची घडी बसवणे महत्त्वाचे होते व सुनेत्रा पवार यांच्यासह पक्षातले सर्व नेते सध्या हेच करताना दिसतात, तर राष्ट्रवादीच्या दुसर्या गटाकडून सातत्याने विलीनीकरणाची चर्चा उपस्थित करून कार्यकर्त्यांचा गोंधळ उडवला जाताना दिसत होता. राष्ट्रवादीच्या पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आपल्या पक्षाच्या मुखपत्रात याबाबत लेख लिहून गोंधळ उडवला होता. काही अदृश्य शक्तींच्या कारवाया, धमक्या व खोट्यानाट्या आरोपांमुळे व त्यांनी रचलेल्या कटामुळे अजितदादांना राष्ट्रवादीतून बाहेर पडून वेगळा गट स्थापन करावा लागला होता; परंतु झालेली चूक दुरुस्त करायची या विचाराने दादा मागील चार-पाच महिन्यांपासून कामाला लागले होते. दोन्ही राष्ट्रवादींचे एकत्रीकरण करायचे असा निर्धार त्यांनी केला होता, १२ फेब्रुवारीला याची घोषणाही होणार होती, असा दावा शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या मुखपत्रात लिहिलेल्या लेखात केला. राष्ट्रवादीचे विलीनीकरण घडवून आणून पक्ष पुन्हा मजबुतीने उभा करणे हीच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही शिंदेंनी या लेखात म्हटले आहे. स्वाभाविकच याची तीव्र प्रतिक्रिया उमटली.

अजित पवार गेल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या नेत्यांनी विलीनीकरणाच्या चर्चेला तोंड फोडले होते; परंतु कोणीही एवढ्या थेट बोलले नव्हते. अदृश्य शक्तीच्या कारवाया व धमक्यांमुळे अजितदादांना राष्ट्रवादीतून बाहेर पडून वेगळा गट स्थापन करावा लागला, असे सांगताना त्यांनी भाजपला व महायुतीसोबत राहण्याची भूमिका घेणार्या सर्व नेत्यांना आरोपीच्या पिंजर्यात उभे केले. प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे हे तर पहिल्या दिवसापासून शरद पवार गटाच्या निशाण्यावर आहेत. विलीनीकरण ही अजितदादांची शेवटची इच्छा होती व हे दोघे भाजपच्या इशार्यामुळे विलीनीकरणाला विरोध करत असल्याचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला; परंतु काहीही झाले तरी विलीनीकरण करून पक्षाची सूत्रे आपल्या हातातून जाऊ द्यायची नाही, अशी अजित पवार गटातील नेत्यांची स्पष्ट भूमिका दिसत होती. सत्तेतला पक्ष असल्याने सद्य:स्थितीत ते यशस्वी झाले तरी भविष्यात आपला गट हीच खरी राष्ट्रवादी काँग्रेस हे अढळपद ते निर्माण करू शकतील का? याबाबत मात्र शंका व्यक्त होते. सुनेत्रा पवार यांच्या पुढील कारकीर्दीत या प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे.

**अजित पवार राजी होते का?**

स्व. अजित पवार यांनी विलीनीकरणाचा निर्णय घेतला होता व १२ फेब्रुवारीला ते याची घोषणाही करणार होते, असा दावा शरद पवार गटातील नेते एकमुखाने करतात, तर केवळ जिल्हा परिषद निवडणुकीत युती करण्याचा निर्णय झाला होता, विलीनीकरणाचा नाही, असा दावा अजित पवार गटाकडून केला जातो. कोण खरे व कोण खोटे हे अजितदादांशिवाय कोणीही सांगू शकत नाही व आज ते हयात नाहीत. त्यामुळे याबाबत कोणीही ठामपणे सांगू शकणार नाही; परंतु अजित पवार यांनी पक्षातल्या एकाही नेत्याला कल्पना न देता, त्यांना विश्वासात न घेता, ज्या भाजपसोबत आज ते सत्तेत आहेत त्यांनाही अंधारात ठेवून विलीनीकरणाचा निर्णय घेतील का? या प्रश्नावर तर्कशुद्ध उत्तर नाही असेच येते.

अनेक प्रश्न अनुत्तरित

शशिकांत शिंदे यांच्या दाव्याप्रमाणे अजित पवार चूक दुरुस्त करणार होते म्हणजे नेमके काय करणार होते? त्यांनी सत्ता सोडण्याचा निर्णय घेतला होता का? की शरद पवार गटाने अजितदादांचे नेतृत्व मान्य करून विलीन होण्याचा, सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी शरद पवार यांनी त्यांना भाजपसोबत जाण्याची अनुमती दिली होती का? सत्तेत जाण्यासाठी सत्तेतला मुख्य पक्ष असलेल्या भाजपसोबत चर्चा झाली होती का ? असे अनेक प्रश्न आहेत, ज्याची उत्तरे कोणीच देत नाही. अजित पवार यांनी २०१४ मध्ये, २०१६-१७ मध्ये व २०१९ मध्ये देखील भाजपबरोबर सत्तेत जाण्याची भूमिका घेतली होती. २०१९ ला तर त्यांनी तसा प्रयत्नही करून पाहिला; पण त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. असे असताना व विधानसभा निवडणुकीला आणखी चार वर्ष शिल्लक असताना त्यांनी सत्तेबाहेर पडण्याची भूमिका कोणालाही विचारात न घेता ठरवली असावी यावर विश्वास ठेवणे कठीण आहे.एकूण स्थिती लक्षात घेतली तर केवळ तीन शक्यता उरतात. त्या म्हणजे विलीनीकरणाचा निर्णय झाला होता; परंतु अजित पवारांच्या निवडणुकीत निधनामुळे पक्षाची भूमिका बदलली असावी, दुसरी शक्यता म्हणजे केवळ चर्चा सुरू होती, निर्णय झालेला नव्हता; परंतु तीन वर्षांपूर्वी हातातून निसटलेला पक्ष पुन्हा ताब्यात घेण्यासाठी शरद पवार गटाकडून विलीनीकरणाचे दावे केले गेले. तिसरी शक्यता म्हणजे, विलीनीकरणानंतरही पक्षाची सूत्रे अजितदादांकडेच राहणार असल्याने भाजपने अनुमती दिली असावी; परंतु दादांच्या आकस्मिक निधनानंतर भूमिका बदलली. यापैकी तिसरी शक्यता अधिक लोकांकडून व्यक्त होते. कारण विलीनीकरणावरून वाद प्रतिवाद सुरू असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असे काही ठरले असते, तर भाजपला त्याची कल्पना दिली गेली असती, सांगतानाच, भविष्यात एकत्र यायचे असेल तरी आमची परवानगी लागेल, असे स्पष्ट केले आहे.

विलीनीकरणाच्या चर्चा विधानसभा निवडणुकीपासून सुरू आ-हेत; पण भाजपने कधीही अशी स्पष्ट भूमिका घेतलेली नव्हती. भाजपकडे लोकसभेत निसटते बहुमत आहे. शरद पवारांच्या आठ खासदारांचे बळ भाजपला नको होते असे नाही; परंतु त्यासाठी भविष्यातील विरोधी पक्षाला संजीवनी देण्याची त्यांची तयारी नाही. कदाचित २०२८ नंतर राजकीय परिस्थिती बघून महाराष्ट्रात स्वबळावर लढायचे की, मित्रपक्षांना सोबत याचा निर्णय भाजप घेईल व त्यावर राष्ट्रवादीचेही भवितव्य ठरणार आहे.

आता विषय बंद प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वक्तव्ये, तसेच रोहित पवार यांनी सरकारविरोधात सुरू केलेली आक्रमक मोहीम पाहता राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची शक्यता जवळपास मावळल्याचे दिसते आहे. शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादी मासिकातील लेखात थेट भूमिका मांडल्यानंतर हा विषय आता आम्ही बंद करणार असल्याचे जाहीर केले आहे. रोहित पवार यांनी अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित करून संशयाचे काहूर निर्माण केले आहे. यातील अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात पहिल्या दिवसापासून आ-हेत. विलीनीकरणाला नकार देणार्या अजित पवारांच्या शंकास्पद मृत्यूबाबत एकही प्रश्न न विचारणार्या नेत्यांना त्यांनी कोंडीत पकडले आहे. आज नाही तरी भविष्यात हीच बाब निर्णायक ठरणार आहे.

**दैव देते, गटबाजी नेते!**दैव देतो आणि गटबाजी नेते, हा काँग्रेसच्या पाचवीला पुजलेला शाप आहे. मागच्या आठवड्यात चंद्रपूर महापालिकेतही याचेच प्रत्यंतर आले. महापालिकांची मतमोजणी झाल्यापासून काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर आणि विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार यांच्यात रस्सीखेच सुरू होती. काँग्रेसला चांगले यश मिळाले होते. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या नगरसेवकांच्या मदतीने काँग्रेसचा महापौर सहज निवडून आला असता; परंतु दोघेही हट्टाला पेटले. शेवटी दिल्लीतून हस्त-क्षेप करावा लागला. दरम्यान भाजपच्या चुंबकीय शक्तीने अनेकांना आपल्याकडे खेचून घेतले होते. ठाकरे गटाच्या ८ नगरसेवकांनी भाजपला मतदान केले. एमआयएम तटस्थ राहिली, वंचित बहुजन आघाडीचे २ नगरसेवक गैरहजर राहिले आणि भाजपचा उमेदवार निवडून आला. कल्याण डोंबिवलीत मनसेने शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिला म्हणून टीका करणार्या खासदार संजय राऊत यांची चंद्रपूरच्या घटनेचे समर्थन करताना दमछाक झाली. लोकसभा निवडणुकीत दादागिरी करून सांगलीची जागा हिरावून घेतली तेव्हा केला त्यापेक्षा अधिक संताप काँग्रेसने यावेळी व्यक्त केला. याचे उत्तर काँग्रेस परभणीत देऊ शकली असती; परंतु काँग्रेसने परभणी महापौरपदाच्या निवडणुकीत आघाडीचा धर्म पाळला. सर्व १२ नगरसेवकांनी शिवसेना ठाकरे गटाला मतदान केले, ठाकरे सेनेचा महापौर निवडून आला. नाही तर ठाकरेंची पाटी कोरी झाली असती.

**-अभय देशपांडे**

## १ Doctor Tips – सल्ला डॉक्टरचा




मला हळूहळू उमगलं की सहवास मला मनापासून आवडतो आहे. मासिक पाळीदरम्यान सहवासही मला आवडू लागला आहे. अनेकदा तर पाळीदरम्यान सहवास मला फारच आनंददायी अनुभव वाटला.मासिक पाळीदरम्यान सहवास करावा की नाही यावर विविध स्तरातून संशोधन सुरू आहे.मला लक्षात आलं आहे की, असं वाटणारी मी एकटीच नाही. एका संशोधनानुसार, ५०० लोकांपैकी ५५ टक्के महिलांनी मासिक पाळीदरम्यान सहवास हा अनुभव अगदीच नैसर्गिक आणि अनोखा असल्याचं सांगितलं.(**क्रमशः**)

## २ Joke – विनोद





एक महिला : माझे पती वाघाप्रमाणे शूर, चित्त्याप्रमाणे चपळ आणि हत्तीप्रमाणे डौलात चालणारे आहेत.
दुसरी महिला : असं? त्यांना बघण्यासाठी किती रुपयाचं तिकीट काढावं लागेल?

## ३ Message – संदेश



1 bacha roj mandir se chapal churata tha,
ek din sare chapal bech ke 1 mobile kharida,
aaj wahi bacha apni story pad raha hai apni mobile pe.

## ४ Thought – सुविचार



संकटांना पाठ दाखविली की संकट पाठीशी लागतात.
– स्वामी विवेकानंद

**संस्कृत सुभाषित**

**मरणस्य मुते! राज्ञो जराधवलचामरा।**
**यात्रा जगति निर्याति स्वाधिव्याधिपताकिनी ॥**

**अर्थ :** हे मुने, आधि व्याधींच्या उंच पताका आणि वार्धक्याच्या पांढऱ्या केसांच्या चवऱ्या ढळत आहेत. (आणि अशा तऱ्हेने) महाराज यम राजांची पालखी जगावर अविरत फिरत आहे.

### आडवे शब्द

१. प्रवासात उपयोगी
३. पाण्याचा साठा, तळे
७. बळजबरीचा मुक्काम
११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे
१२. धातूचा नाजूक तंतू
१३. लाकडाची उत्कृष्ट जात
१४. समुदाय, गट
१६. एक नैसर्गिक शीतपेय
१७. थडगे
१८. मृत्यू नसलेला
१९. मान, प्रतिष्ठा, बूज
२०. सुकुमार
२१. चंदन उगाळण्याचा दगड
२४. मधली खोली
२६. गावातील देवाचा उरुस
२७. 'एनओसी' मराठीत
३१. पुढारी
३२. लढाई, चकमक
३३. जागृत, चकमक
३३. जागृत, स्थान
३५. हुशार, चलाख
३७. श्रेष्ठ पुरुष
३९. सुतळीचे कापड
४२. तिंबा!
४४. पुत्र, मुलगा
४६. फसविणे
४८. कान व डोळे ताठ करणे
५०. सैन्याचा मालपुरवठा
५२. वजा
५३. सरस्वतीचे एक नाव
५६. माराची खूण
५७. क्षण (हिंदी)
५८. ओलसर हवा
६०. पुन्हा पुन्हा
६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी
६४. पुंकेसर
६५. मत्स्य
६७. बोलणे
६९. मुलगा
७०. टाळ्यांचा जोरदार आवाज
७१. अगम्य
७३. खटला
७५. स्तुती करणारा
७६. अस्वल
७७. जन्म, मृत्यू
७८. तटबंदी

### उभे शब्द

१. चाहता
२. यामुळे रामायण घडले
३. जन्मदात्री
४. नेहमी बुजणारा
५. बाण
६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान
७. ठाण्याचा रहिवासी
८. वाघाची मावशी
९. भीती, भय
१०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव
१३. सामोपचार
१५. भाताला दिलेला आकार
१८. धाकटा भाऊ
२०. हुक्की, लहर
२१. च्या बरोबर
२२. जय-पराजय
२३. कर्ज, उपकार
२४. फक्त, केवळ
२५. जाते फिरतानाचा आवाज
२६. जन्मापासून
२७. ख्रिसमस
२८. शिव्याशाप
२९. हत्तीचा शिक्षक
३०. वारा
३२. वर्ष
३४. थंडीने गार पडणे
३६. दारूचा एक प्रकार
३८. आवाज, गोंगाट
४०. रोखलेली नजर
४१. एक जंगली फूल
४३. वरपांगी
४५. सोसाट्याचा वारा
४७. अवाढव्य, भव्य
४९. उणे
५१. नवऱ्याची दुसरी पत्नी
५२. संयम सुटलेला, अधीर
५४. बरणीला लावण्याचे फडके
५५. विहीर, --नलिका
५७. मान्यतापत्र
५९. नंतर
६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
६१. थेट, सरळ
६२. धोबी
६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात
६६. बडबड
६८. नोकरी
७१. शर्त, पण
७२. फोडातील द्रव
७४. डावा

### आडवे उत्तरे


१.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट फ ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७९.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

### उभे उत्तरे

१.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यमलोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळाट २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम

# महाशब्दकोड्यांचा समाचार

कोडे क्र.९





# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त



### मानले भाऊ तुला! शमीचा रणजीदतब्बल ८ विकेट्स घेत फलंदाजांची भंबेरी उडवली

मुंबई -मोहम्मद शमीने रणजी सेमीफायनलमध्ये बंगालकडून खेळताना एका डावात ८ विकेट्स घेतल्या आहेत. टी-२० विश्वचषक सुरू असतानाच रणजी ट्रॉफी २०२५-२६ चे सेमीफायनलचे सामने खेळवले जात आ-हेत. एक सेमीफायनल कर्नाटक आणि उत्तराखंड यांच्यात खेळवली जात आहे. तर दुसरा सेमीफायनल सामना बंगाल व जम्मू-काश्मीर संघात होत आहे. या सामन्यात मोहम्मद शमीने उत्कृष्ट गोलंदाजी करत ८ विकेट्स आपल्या नावे केल्या.

### युवराज सामराचा 'वर्ल्ड रेकॉर्ड' वर्ल्डकपमध्ये अशी कामगिरी करणारा जगातील पहिला फलंदाज

नवी दिल्ली-टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये आज १७ फेब्रुवारीला कॅनडा आणि न्यूझीलंड यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात कॅनडाने कमालीची फलंदाजी केली. कॅनडाचा सलामीवीर फलंदाज असलेल्या युवराज सामराने न्यूझीलंडविरूद्ध सामन्यात शतक झळकावलं आहे. १९ वर्षीय या भारतीय वंशाच्या फलंदाजाने किवी गोलंदाजांची धुलाई करत संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या शतकी खेळीसह त्याने वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे.कॅनडाच्या युवराज सामराने न्यूझीलंडविरूद्ध टी-२० वर्ल्डकपमध्ये झळकावलं वादळी शतक.युवराज सामराने फक्त ५८ चेंडूत शतक झळकावलं. तर अखेरच्या षटकात मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. युवराज सामराने या सामन्यात ६५ चेंडूत ११ चौकार व ६ षटकारांसह १६८.३३ च्या स्ट्राईक रेटसह ११० धावांची उत्कृष्ट खेळी केली.

### एकही बॉल न खेळता झिम्बॉब्वे सुपर ८ मध्ये पोहोचणार

कोलंबो-टी २० वर्ल्ड कप सध्या रोमांचक स्थितीत पोहोचला आहे. सुपर ८ मध्ये सहा संघांनी स्थान मि ळवलं आहे. ब गटातून श्रीलंकेनं ऑस्ट्रेलियाला पराभूत करत स्थान निश्चित केलं. यानंतर आता ब गटातून सुपर ८ मध्ये कोण पोहोचणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. झिम्बॉब्वे पोहोचणार की ऑस्ट्रेलिया धमाकेदार पुनरागमन करणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. ऑस्ट्रेलियाचे सलग दोन पराभव झाल्यानं त्यांचा सुपर ८ चा मार्ग खडतर झाला आहे. झिम्बॉब्वे आणि आयरलँड यांच्यातील सामन्याच्या निकालावर ऑस्ट्रेलियाचं भवितव्य अवलंबून आहे. मात्र, पल्लेकल्लेमध्ये जोरदार पाऊस सुरु असल्यानं मॅच सुरु झालेली नाही. झिम्बॉब्वे आणि आयरलँड मॅच रद्द झाल्यास ऑस्ट्रेलिया टी २० वर्ल्ड कपबाहेर जाऊ शकते. तर झिम्बॉब्वे सुपर ८ मध्ये धडक मारेल. झिम्बॉब्वे सुपर ८ मध्ये पोहो-चणार? टी २० वर्ल्ड कपच्या सुपर ८ साठी ब गटातील गणित रोमांचक बनलं आहे.

# न्यूझीलंडचा 'अव्वल आठ' मध्ये प्रवेश

## कॅनडावर मात, युवराज सामराचे विक्रमी शतक व्यर्थ

**नवी दिल्ली:**कॅनडाच्या युवराज सामराचे विक्रमी शतक व्यर्थ ठरवत न्यूझीलंडने 'अव्वल आठ' फेरीत धडक मारली आहे. ग्लेन फिलिप्स आणि रचिन रवींद्रच्या तुफानी फटकेबाजीमुळे न्यूझीलंडने १७४ धावांचे आव्हान अवघ्या १५.१ षटकांतच पूर्ण केले.





ट्वेन्टी-२० विश्वचषकातील सर्वात युवा शतकवीर युवराज सामरा (कॅनडा) आणि न्यूझीलंडच्या विजयाचे शिल्पकार ग्लेन फिलिप्स-रचिन रवींद्र. (छायाचित्र:लोकसत्ता टीम)

### न्यूझीलंडने १७४ धावांचे आव्हान अवघ्या १५.१ षटकांतच पूर्ण केले

वृत्तसंस्था, चेन्नई - ग्लेन फिलिप्स (३६ चेंडूंत नाबाद ७६) आणि रचिन रवींद्र (३९ चेंडूंत नाबाद ५९) यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडने मंगळवारी कॅनडाचा आठ गडी राखून सहज पराभव करत ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अव्वल आठ' फेरीत प्रवेश केला. कॅनडाच्या युवराज सामराचे (६५ चेंडूंत ११०) विक्रमी शतक व्यर्थ ठरले.

'ड' गटातून आपले आव्हान कायम राखण्यासाठी कॅनडा आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांना विजय आवश्यक होता. चेन्नई येथे झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर युवराजच्या शतकाच्या जोरावर कॅनडाने २० षटकांत ४ बाद १७३ धावा केल्या. मात्र, फिलिप्स आणि रवींद्रच्या १४६ धावांच्या अभेद्य भागीदारीने युवराजची विक्रमी खेळी झाकोळली गेली. न्यूझीलंडने १५.१ षटकांतच २ बाद १७६ धावा करून विजय मिळवला. फिलिप्सने सहा षटकार आणि चार चौकार, तर रचिनने तीन षटकार आणि चार चौकारांची आतषबाजी केली.

आक्रमक खेळाच्या नादात फिन ॲलन (२१) आणि टीम सेफर्ट (६) लवकर बाद झाल्याने न्यूझीलंड संघ २ बाद ३० असा अडचणीत आला होता. त्या वेळी फिलिप्स आणि रवींद्र यांनी 'पॉवर-प्ले'मध्येच न्यूझीलंडची धावसंख्या ६० पर्यंत नेली. त्यानंतरच फिलिप्सच्या आक्रमकतेला अधिकच धार आली. त्याने २२ चेंडूंतच आपले अर्धशतक साजरे केले. ट्वेन्टी-२० विश्वचषकात न्यूझीलंडकडून हे सर्वांत जलद अर्धशतक ठरले. रवींद्रने ३५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केल्यावर षटकारांची मालिका लावत न्यूझीलंडच्या विजयावर झटपट शिक्कामोर्तब केले. या गटात दक्षिण आफ्रिका आघाडीवर राहिला असून, न्यूझीलंड दुसऱ्या स्थानावर आहे. कॅनडाला आतापर्यंत एकही सामना जिंकता आलेला नाही. त्यांची अखेरची लढत अफगाणिस्तानशी होणार आहे.

तत्पूर्वी, डावखुरा युवा फलंदाज युवराज समराने ५८ चेंडूंत शतक झळकावून ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात आपले नाव कोरले. समराने आपल्या ६५ चेंडूंतील शतकी खेळीत सहा षटकार आणि ११ चौकार मारले. त्याला कर्णधार दिलप्रीत बाजवाची साथ मिळाली. या जोडीने ११६ धावांची सलामी दिली. मात्र, बाजवाला (३९ चेंडूंत ३६) धावांचा वेग राखता आला नाही. तो बाद झाल्यावर समराने ९१ धावांवर मॅट हेन्रीकडून मिळालेल्या जीवदानाचा फायदा घेत पहिलेवहिले शतक साजरे केले. कॅनडाला अखेरच्या तीन षटकांत केवळ २३ धावा करता आल्यामुळे त्यांच्या आव्हानावर मर्यादा पडल्या.

संक्षिप्त धावफलक

कॅनडा : २० षटकांत ४ बाद १७३ (युवराज सामरा ११०, दिलप्रीत बाजवा ३६; जेकब डफफी १/२५, मॅट हेन्री १/२८) पराभूत वि. न्यूझीलंड १५.१ षटकांत २ बाद १७६ (ग्लेन फिलिप्स नाबाद ७६, रचिन रवींद्र नाबाद ५९; साद बिन जफर १/२९).

ट्वेन्टी-२० विश्वचषकातील सर्वात युवा शतकवीर

युवराज सामरा (कॅनडा) : १९ वर्षे १४१ दिवस
अहमद शहझाद (पाकिस्तान) : २२ वर्षे १२७ दिवस
सुरेश रैना (भारत) : २३ वर्षे १५६ दिवस
ॲलेक्स हेल्स (इंग्लंड) : २५ वर्षे ८३ दिवस
ग्लेन फिलिप्स (न्यूझीलंड) : २५ वर्षे ३२७ दिवस

## क्रिकेटपटू स्मृती मानधनाने जिंकला 'बीबीसी'चा मानाचा पुरस्कार, ठरली 'इंडियन स्पोर्ट्स वुमन ऑफ द ईयर'ची मानकरी

मुंबई -महाराष्ट्राची लेक आणि भारतीय महिला क्रिकेट संघातील आघाडीची फलंदाज असलेल्या स्मृती मानधना हिची २०२५ सालच्या 'बीबीसी इंडियन स्पोर्ट्सवुमन ऑफ द ईयर' या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. भारतीय महिला संघाने २०२५ साली एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक जिंकला होता. भारतीय संघाच्या या विजयात स्मृती मानधना हिने महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्यामुळेच स्मृती मानधना ही 'बीबीसी इंडियन स्पोर्ट्सवुमन ऑफ द ईयर' पुरस्काराची मानकरी ठरली. सोमवारी दिल्लीत पार पडलेल्या भव्य सोहळ्यात बीबीसी पुरस्काराच्या मानकऱ्यांना गौरवण्यात आले. स्मृती मानधना ही महाराष्ट्रातील सांगलीची आहे. एका लहान शहरातून क्रिकेट खेळायला सुरुवात करुनही तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी झेप घेतली आहे.



स्मृती मानधना ही सध्या भारतीय संघासोबत ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. ऑस्ट्रेलियात भारतीय संघ एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० मालिका खेळणार आहे. परदेशात असल्यामुळे स्मृती मानधना कालच्या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहू शकली नाही. तिने एका ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल बीबीसीचे आभार मानले. भारतीय महिला क्रिकेटसाठी २०२५ हे वर्ष खूपच खास राहिले. भारतीय संघाच्या विश्वचषक विजयात मी योगदान देऊ शकले, याचा मला आनंद असल्याची भावना स्मृती मानधना हिने बोलून दाखवली. बीबीसीच्या या पुरस्कार विजेत्यांची निवड करणाऱ्या परीक्षकांच्या यादीत टेनिसपटू लिएंडर पेस, दीपा मलिक, अंजू बॉबी जॉर्ज यांचा समावेश होता.

२९ वर्षाची स्मृती मानधना ही आजघडीला भारतीय महिला क्रिकेट संघाचा प्रमुख भाग आहे. तिने गेल्या काही वर्षामध्ये शानदार खेळाचे प्रदर्शन करत भारतीय क्रिकेटमध्ये स्वत:चा ठसा उमटवला आहे. आजघडीला स्मृती मानधना ही आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटमधील सर्वात यशस्वी ठरलेल्या खेळाडूंपैकी एक म्हणून ओळखली जाते. महिला क्रिकेटमध्ये स्मृती मानधना ही सर्वाधिक शतकं करणाऱ्या खेळाडूंच्या दुसऱ्या स्थानावर आहे. तसेच सर्वाधिक धावा करणाऱ्या महिला क्रिकेटपटूंच्या यादीत ती तिसऱ्या स्थानी आहे. २०२५ साली स्मृती मानधना हिने ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना अवघ्या ५० चेंडूत शतक झळकावले होते. आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारी ती दुसरी खेळाडू ठरली आहे.

बीबीसीच्या पुरस्कारांचे मानकरी

बीबीसी इमर्जिंग प्लेयर ऑफ द ईयर (उदयोन्मुख खेळाडू): बुद्धिबळ ग्रँडमास्टर दिव्या देशमुख
बीबीसी पॅरा-स्पोर्ट्सवुमन ऑफ द ईयर: पॅरा-ॲथलीट प्रीती पाल
बीबीसी लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड: नेमबाज अंजली भागवत

## सुर्यकुमारच्या 'त्या' शॉटमुळे तारिक उस्मानसह पाकची टीम अजूनही शॉकमध्ये

कोलंबो-कोलंबोच्या मैदानावर भारत विरुद्ध पाकिस्तानचा टी२० विश्वकप सामना रंगला होता. ११ व्या ओव्हरमध्ये पाकिस्तानी वेगवान गोलंदाज उस्मान तारिक गेंदबाजीला आला. आमचे बॉलर्स भारतीय फलंदाजांना चांगलेच अडचणीत आणतील आणि दोन-तीन झटपट विकेट्स घेऊन संपूर्ण खेळ फिरवता येईल, असे पाकिस्तानला वाटत होते. खासकरुन तारिक उस्मानवर त्यांचा जास्तच विश्वास होता. सुरुवातीला अभिषेक शर्माची विकेट पडल्यानंतर त्यांचा आत्मविश्वास आणखीनच वाढला. पण पुढे सूर्यकुमार यादव खेळायला आला आणि त्याने सगळे चित्रच बदलून टाकले आणि पाकिस्तानची योजना धुळीस मिळाली. कारण रोहित शर्माचा एक सल्ला सुर्यकुमारच्या कामी आला होता. काय घडले नेमके?

सर्वांच्या नजरा सुर्याकडे

उस्मान तारिक हा गोलंदाज आपल्या खास 'पॉज'साठी जगभरात चर्चेत होता. बॉल फेकण्यापूर्वी धाव घेताना एक क्षण थांबतो, मग अचानक बॉल सोडतो. याबद्दल सामन्यापूर्वी खूप गोष्टी बोलल्या गेल्या. टीम इंडिया याचा कसा सामना करणार? हे सर्वजण पाहत होते. सुर्या बॅटींगला होता, उस्मानने धाव घेतली आणि त्याने आपली नेहमीचा पॉज घेतला. तेव्हा सगळ्यांच्या नजरा सूर्यकुमारकडे खिळल्या.

पाकिस्तानला मोठा

स्ट्राईकवर उभा असलेला सूर्यकुमार पूर्णपणे स्थिर होता. त्यांच्या पायात, शरीरात किंवा बॅटमध्ये कोणतीही हालचाल दिसत नव्हती. उस्मानने बॉल सोडल्याबरोबर सूर्यकुमार तयारच होता. त्यांने पहिल्याच बॉलवर उत्तम



पुल शॉट खेळला आणि लाँग-ऑन आणि मिड-विकेट दरम्यानच्या जागेत सुंदर चौकार मारला. या एकाच बॉलने मानसिक लढाई पूर्णपणे भारताच्या बाजूने वळली आणि पाकिस्तानला मोठा धक्का बसला.

**रोहित शर्माच्या सल्ल्याची आठवण ?**

सूर्यकुमारची ही रणनीती रोहित शर्मा यांच्या एका अनुभवाची आठवण करून देते. न्यूझीलंडमध्ये एका सुपर ओव्हरमध्ये टिम साउथी विरुद्ध रोहित प्रथम जास्त हालचाल करत होता. पण नंतर तो पूर्ण शांत राहिला. त्यांने क्रीजवर स्थिर उभे राहून कमीत कमी हालचाल केली. त्यामुळे २ सिक्सर मारून सामना जिंकला. 'शांत राहणे आणि दबाव बॉलरवर आणणे हाच खरा मंत्र आहे', असे रोहितने एका मुलाखतीत सांगितले होते. सूर्याने या मॅचमध्ये नेमके तेच केले.सामन्यावर कसा परिणाम?

या हुशार खेळीमुळे पाकिस्तानचे बॉलिंग नियोजन पूर्ण फसले. मदत देणाऱ्या खेळपट्टीवरही उस्मान भारतीय फलंदाजांवर वर्चस्व गाजवू शकला नाही आणि सामना भारताच्या बाजूने ठामपणे वळला. कठीण परिस्थितीत सूर्यकुमारची ही शांत आणि बुद्धिमान फलंदाजी पाहणे खूप आनंददायक होते. आता जगभरातील क्रिकेटपटू पॉझची ही युक्ती अवलंबताना दिसू शकतील.

## भारत-पाकिस्तानमध्ये तणाव असताना कपिल देव, सुनील गावसकर यांची पाकिस्तान सरकारकडे मोठी मागणी



दिल्ली,-भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कपिल देव आणि सुनील गावसकर यांच्यासह आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर काही खेळाडू एका मागणीसाठी एकत्र आले आहेत. त्यांनी पाकिस्तान सरकारला पत्र लिहून एक मागणी केली आहे. एकाबाजूला भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेट संघात आशिया चषकापासून तणाव पाहायला मिळत आहे. एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर सीमेवरील आणि क्रिकेटच्या मैदानावरील परिस्थिती बदलली. मात्र सुनील गावसकर आणि कपिल देव यांनी पाकिस्तानच्या क्रिकेटपटूंशी आणि एक खेळाडू म्हणून आपली स्वतंत्र भूमिका मांडली आहे.पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि माजी क्रिकेटपटू इम्रान खान हे काही वर्षापासून तुरुंगात आहेत. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप असून त्यांना शिक्षा सुनावण्यात आली आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या प्रकृतीविषयी वेगवेगळ्या वावड्या उठत आहेत. इम्रान खान यांच्या तीन बहिणींनी रावळपिंडीमधील कारागृहाबाहेर आंदोलन केले होते. त्यानंतर इम्रान खान यांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करण्यात आली.पाकिस्तानमधील स्थानिक माध्यमांच्या हवाल्यानुसार इम्रान खान यांच्या एका डोळ्याला दुखापत झाली असल्याचे समजते. अशा परिस्थितीत इम्रान खान यांना पुरेशी आणि तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी आणि त्यांची प्रतिष्ठा राखली जावी, याबद्दल जागतिक स्तरावरील खेळाडू एकत्र आले आहेत. १७ फेब्रुवारी रोजी माजी कर्णधारांनी एक संयुक्त निवेदन जाहीर केले आहे. ज्यात इम्रान खान यांच्याबद्दल काळजी व्यक्त करण्यात आली. जवळपास अडीच वर्षापासून इम्रान खान कारागृहात आहेत. या निवेदनावर कपिल देव, सुनील गावसकर यांच्यासह मायकेल आथर्टन, ॲलन बॉर्डर, मायकेल ब्रेअरली, ग्रेग चॅपेल, इयान चॅपेल, बेलिंडा क्लार्क, डेव्हिड गॉवर, किम ह्यूजेस, नासेर हुसेन, क्लाइव्ह लॉयड, स्टीफन वॉ आणि जॉन राईट यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पायलट पत्नीच्या करिअरसाठी क्रिकेट, देश सोडला! आता तो वर्ल्डकप गाजवतोय

**मुंबई**-टी-२० क्रिकेटच्या इतिहासामध्ये यंदाच्या म्हणजेच २०२६ च्या पर्वामध्ये सर्वाधिक संघ विश्वचषकावर नाव कोरण्यासाठी सहभागी झाले आहेत. चार ग्रुपमध्ये एकूण २० संघांना प्रत्येकी पाच प्रमाणे विभागण्यात आलं असून लवकरच यामधून अंतीम आठ संघ सुपर एट फेरीत प्रवेश करतील. साखळी फेरीमध्ये लहान संघांनी धमाकेदार कामगिरी केली आहे. यंदाच्या विश्वचषकामध्ये सर्वात धक्कादायक निकाल बी ग्रुपमध्ये काही दिवसांपूर्वी लागला. झिम्बाव्वेच्या संघाने ऑस्ट्रेलियाला धूळ चारत सर्वानाच धक्का दिला. झिम्बाव्वेच्या या ऐतिहासिक विजयामध्ये संघातील जुन्या खेळाडूंबरोबरच नव्या खेळाडूंनीही मोलाची जबाबदारी खांद्यावर घेत विजयश्री खेचून आणला. या मोजक्या नावांपैकी एक खेळाडू म्हणजे, ग्रॅमी क्रिमर!

हा खेळाडू का क्रिकेटमधून बाहेर पडलेला?

खरं तर ग्रॅमी क्रिमर एकेकाळी झिम्बाब्वेचा कर्णधार होता. मात्र झिम्बावेमधील चिंताजनक राजकीय आणि सामाजिक स्थिती तसेच घरातील हालाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे ग्रॅमी क्रिमर सात वर्षे क्रिकेटच्या मैदानापासून दूर राहिला. मात्र, क्रिकेटवरील त्याच्या प्रेमामुळे त्याला पुन्हा एकदा मैदानावर परतण्याची संधी मिळाली आणि तो या संधीचे सोने करत असल्याचे सध्या सुरु असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत दिसून येत आहे.

बायको-पोरांसाठी देश सोडला

ग्रॅमी क्रिमरची क्रिकेटच्या मैदानातून अचानक झा-लेली एक्झिट आणि तितक्याच रंजकपणे त्याने पुन्हा मैदानात ठेवलेलं पाऊल हे सारे कथानक एखाद्या चित्रपटाच्या पटकथेपेक्षा कमी नाही. २०१९ मध्ये, जेव्हा झिम्बाब्वे क्रिकेट पूर्णपणे उद्ध्वस्त झाले होते, तेव्हा ग्रॅमी क्रिमरच्या वैयक्तिक आयुष्यातही बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला. खरं तर परिस्थिती एवढी वाईट होती की पुन्हा झिम्बाब्वेच्या राष्ट्रीय संघातून आपण क्रिकेटपटू म्हणून कधी खेळू असं त्याला वाटलं नव्हतं. घराला सावरण्यासाठी ग्रॅमी क्रिमरची पत्नी मार्मा दुबईमध्ये नोकरीला लागली. ग्रॅमी क्रिमर त्यांच्या दोन मुलांसह दुबईला गेला. त्यावेळीही आपल्यातील क्रिकेटपटू त्याला मरु द्यायचा नव्हता. म्हणूनच त्याला तेव्हा वाटत होते की तो त्याची क्रिकेटची आवड जोपासण्यासाठी



दुबई आणि झिम्बाब्वे दरम्यान वरचे वर प्रवास करुन क्रिकेटच्या संपर्कात राहील. मात्र काही काळातच त्याला संसार संभाळून हे असं काही करणं फार कठीण असल्याचे कळून चुकलं. अखेर इच्छा नसतानाही ग्रॅम क्रिमरने क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आणि आपल्या पत्नीचे पायलट होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो सारं काही सोडून दुबईला स्थलांतरित झाला.

राजस्थान रॉयल्स कनेक्शन

ग्रॅम क्रिमरची पत्नी मार्मा ही आज एक प्रोफेशनल पायलट आहे. मार्माने तिच्या कारकिर्दीची सुरुवात झिम्बाब्वे एअरलाइन्समधून केली. २०१९ मध्ये, तिला एमिरेट्स एअरलाइन्समध्ये नोकरी मिळाली. संधी आणि पगार चांगला असल्याने मार्मासहीत संपूर्ण कुटुंबाला दुबईला स्थलांतरित व्हावे लागले. एकीकडे ग्रॅमी क्रिमरच्या पत्नीची कारकीर्द भरारी घेत असताना, ग्रॅम क्रिमर मात्र क्रिकेटपासून दूर होता. दरम्यानच्या काळात क्रिकेटशी कनेक्टेड राहता यावं म्हणून ग्रॅमी क्रिमरने दुबईतील राजस्थान रॉयल्स अकादमीशी संपर्क साधला. तिथून, त्याच्या नशिबाने पुन्हा कलाटणी घेतली. त्याने राजस्थान रॉयल्स क्रिकेट अकादमीमध्ये प्रशिक्षक म्हणून काम सुरू केले. प्रशिक्षण क्षेत्रातील या नव्या कारकिर्दीमुळे त्याला आपल्या आवडत्या खेळाडकडे एका नवीन दृष्टिकोनातून पाहण्याची संधी मिळाली.

...अन् परत तो क्रिकेटच्या मैदानात परतला!

काही काळ असाच गेल्यानंतर, ग्रॅमी क्रिमरचा जुना मित्र ब्रेंडन टेलरने त्याच्याशी संपर्क साधला. टेलर स्वत: क्रिकेटमध्ये घालण्यात आलेल्या बंदीच्या कालावधीमधून क्रिकेटच्या मैदानात पुनरागमन करत होता. त्याने क्रिमरला पुन्हा एकत्र खेळलं पाहिजे असं म्हणत पुन्हा खेळाडू म्हणून मैदानात परण्यासाठी प्रोत्साहन दिलं. मात्र, झिम्बाब्वे क्रिकेटचे व्यवस्थापकीय संचालक गिव्हमोर माकोनी यांनी ग्रॅमी क्रिमरला लगेच राष्ट्रीय संघात स्थान देणं शक्य नसल्याचं स्पष्टपणे सांगितले. ग्रॅमी क्रिमरला प्रथम देशांतर्गत स्पर्धांमध्ये आपली शारीरिक क्षमता आणि फॉर्म सिद्ध करण्यास सांगण्यात आलं. ग्रॅमी क्रिमरने देशांतर्गत क्रिकेटमध्ये ताकाशिंगा संघाकडून १२ सामने खेळले. यामध्ये ४० विकेट्ससह ग्रॅमी क्रिमर स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाज ठरला. तरीही, त्याची टी-२० विश्वचषक पात्रता फेरीसाठी निवड झाली नव्हती. परंतु ग्रॅमी क्रिमरने संघासोबत सराव सुरु केला. नंतर त्याला टी-२० विश्वचषक संघात स्थान देण्यात आले. आता २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत झिम्बाब्वेकडून खेळण्याचं ग्रॅमी क्रिमरचे स्वप्न उराशी बाळगले आहे. सध्याची कामगिरी पाहता हे स्वप्न पूर्ण होईल अशी दाट शक्यता आहे.

## महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या हत्या चिंताजनक : अभाविप

**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी, लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात काल सायंकाळच्या सुमारास महाविद्यालयातील विद्यार्थी विक्रम पांचाळ याची एका अज्ञात तरुणाने चाकूने भोसकून हत्या केली. विक्रम पांचाळ हा तंत्रनिकेतन महाविद्यालयातील वसतिगृहात राहणारा विद्यार्थी असून बांधकाम अभियंता या शाखेचे तृतीय वर्षाचे शिक्षण घेत होता. तसेच लातूर जवळील कुंभारवाडी या गावचा तो रहिवासी होता.मागील ४ महिन्यात लातूर शहरात विद्यार्थ्यांची हत्या होण्याची ही पाचवी घटना आहे. लातूरच्या एमआयडीसी परिसरात असलेल्या महिला बीसीए महाविद्यालयात डीएमएलटी प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या दोघा विद्यार्थ्यांवर चौघा तरूणांनी काठीने हल्ला केला, ही घटना फ्रेशर्स पार्टीच्या दरम्यान घडली यातच सुरज शिंदे नावाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. त्यानंतर निलंगा तालुक्यातील आठ विद्यार्थी मागील एका महिन्यापासून अचानक बेपत्ता झालेले आहेत.अशा विविध घटना लातूर जिल्ह्यात सातत्याने घडत आहेत. यामुळे विद्यार्थी तसेच पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कायदा व सुव्यवस्था फाट्यावर मारून काही गुंड प्रवृत्तीचे तरुण नशेच्या माध्यमातून अशा पद्धतीचे गुन्हे करत आहेत. प्रशासनाने या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे अशा घटना वारंवार घडतांना दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाने या गुन्ह्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करावी.अभाविप लातूर महानगर मंत्री कु. निशिगंधा बेंबळे म्हणाल्या की, कालच पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर झालेला हल्ला आणि त्यात त्याचा झालेला दुर्दैवी मृत्यू ही लातूर सारख्या सुसंस्कृत शहरासाठी अत्यंत चिंताजनक बाब आहे. मागील काही महिन्यांपासून शैक्षणिक परिसरात सातत्याने या घटना घडत आहेत. प्रशासनाने गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करून अशा घटनांवर आवर घालावा अशी मागणी अभाविप करत आहे.

# शिवजन्मोत्सवा निमित्त महावितरणचे महारक्तदान शिबीर

## ५६ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उत्सफूर्तपणे केले रक्तदान

**लातूर/प्रतिनिधी :** शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने महावितरणच्या संयुक्त शिवजयंती सिमतीच्या वतीने दरवर्षी विविध समाजउपयोगी उपक्रम राबविले जातात ही गौरवाची बाब असून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे सांगत या उपक्रमात सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी उत्सफूर्त सहभाग घेत समाजिक जाणीव जोपासावी असे विचार मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले.

महावितरणच्या लघूप्रशिक्षण सभागृहात पार पडलेल्या महारक्तदान शिबीरात ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे, मानव संसाधन विभागाचे सहाय्यक महाव्यवस्थापक चेतन वाघ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता शैलेश पाटील, धनंजय जाधव, प्रमोद दुधाळे उपकार्यकारी अभियंता श्रीशैल्य लोहारे यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडलेल्या महारक्तदान शिबीरात श्री



बुलबुले पुढे म्हणाले की, शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने राबविला जाणारा हा उपक्रम खरोखरच कौतूकास्पद आहे. घरोघरी विजेच्या माध्यमातून प्रकाश पोहचवणारे हात रक्तदानासारख्या कामीही हिरीरिने पुढे येत सामाजिक बांधिलकी जोपासत असल्याचा अभिमान आहे असे कौतूकोउदगार काढले.

स्वराज्य म्हणजे गोरगरिबांच्या, उपेक्षितांच्या , शोषितांच्या उद्धारासाठी छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेले लोककल्याणकारी राज्य आणि हाच संदेश घेऊन शिवरायांना अनोख्या पद्धतीने मानवंदना द्यावी या हेतूने मंगळवारी (दि.१७ ) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे संयोजक सहाय्यक अभियंता राहूल गाडे यांनी सांगीतले. सदर शिबिरास महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. यावेळी ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या सुपूर्द करण्यात आले. या रक्तदान शिबिरासाठी शिवजन्मोत्सव समितीचे प्रशांत जाधव, विवेकानंद स्वामी, अमोल जाधव, विक्रम लोंढे, रवकिरण जेवरीकर, राहुल गाडे, जय सावंत, अजीत जैन, सोमेश्र्वर गुजराथी, पवन कदम, अमित शृंगारे, सचिन सूर्यवंशी, ईश्र्वर देशमुख, शकील लडाख, कापसे, अंजनवतीकर, नवनाथ मोरे यांनी तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. तसेच प्रमोद कांबळे यांनी सुत्रसंचालन केले. याकामी विलासराव देशमूख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या डॉक्टर्स व तज्ञ कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.यावेळी रक्तदात्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

## प्रवर्गाच्या जाचक अटीमुळे पारंपारिक सोनार कारागीर सन्मानापासून वंचित नियमावलीत सुधारणेची मागणी

**सोलापूर /प्रतिनिधी:** केंद्र सरकारने पी. एम. विश्वकर्मा योजने अंतर्गत सोनार – सुवर्णकार समाजाला पारंपारिक कारागीर म्हणून मान्यता दिली असताना महाराष्ट्र शासनाच्या ''विश्वकर्मा पुरस्कार '' नियमावलीतील तांत्रिक त्रुटीमुळे ओबीसी प्रवर्गातील सुवर्णकारांना डावलले जात आहे. ही विसंगती दूर करून शासन निर्णयामध्ये तातडीने दुरुस्ती करावी.

या मागणीचे निवेदन सोनार समाज संस्था, सोलापूर च्या वतीने सोलापूर येथील सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांना देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंत पोतदार, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार आणि सचिव दत्तगुरु वेदपाठक यांच्यासह समाज बांधवही उपस्थित होते. निवेदनात नमूद केल्यानुसार केंद्र सरकारच्या पी. एम. विश्वकर्मा योजनेत १८ पारंपारिक व्यवसायामध्ये सोनार ( गोल्ड स्मिथ ) व्यवसायाचा समावेश अग्रक्रमाने करण्यात आला आहे. मात्र राज्य शासनाच्या बहुजन कल्याण विभागामार्फत दिला जाणारा ''विश्वकर्मा पूरस्कार '' केवळ व्हिजे एनटी आणि एसबीसी प्रवर्गापूरता मर्यादित ठेवण्यात आला आहे.



यामुळे पिढ्यानं पिढ्या हाताने कोरीव काम, नक्षी काम आणि दुर्मिळ तार काम करणाऱ्या ओबीसी सोनार सुवर्णकारावर अन्याय होत आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक संचालकाशी सविस्तर चर्चा केली. यावेळी अध्यक्ष वसंत पोतदार यांनी प्रशासकीय पेच निदर्शनास आणून देताना सांगितले की, कौशल्याला जात नसते. केंद्राने ज्यांना विश्वकर्मा मानले त्यांना राज्यानेही मानावे.

यावर सहाय्यक संचालकांनी सकारात्मक प्रतिसाद देत हे निवेदन मंत्रालय स्तरावर प्रधान सचिवाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठवण्याचे आश्वासन दिले. या निवेदनामुळे सोनार सुवर्णकार समाजातील कष्टकरी कारागीरामध्ये न्यायाची आशा निर्माण झाली आहे. सदर निवेदन मा. मुख्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, सोलापूर जिल्हा पालक मंत्री आणि विधान परिषद आमदार सौं. चित्राताई वाघ यांनाही पाठविण्यात आले आहेत.

## महाशिवरात्रीनिमित्त चौदाघर मठ महिला भजनी मंडळाकडून १०१ लिटर दुधाचा दुग्धाभिषेक

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील चौदाघर मठ महिला भजनी मंडळाच्या वतीने महाशिवरात्री निमित्त श्री संत शिवयोगी झिंगणप्पा सिद्धमलप्पा स्वामी महाराज यांच्या दक्षिणमुखी शिवपिंडीवर १०१ लिटर दुधाचा सामूहिक दुग्धाभिषेक करण्यात आला. परिसरातील महिलांनी मोठ्या भक्तिभावाने या धार्मिक सोहळ्यात सहभाग नोंदवला.

चौदाघर मठातून निघालेल्या कलश मिरवणुकीत झिंगणप्पा गल्ली, जुनी सराफ गल्ली, राचट्टे गल्ली तसेच चौदाघर मठ परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ताल–मृदुंगाच्या गजरात आणि हाती पताका घेऊन महिलांनी भक्तिमय वातावरण निर्माण केले. ही मिरवणूक रात्री ११ वाजता चौदाघर मठातून निघून फटाक्यांच्या आतषबाजीत औसा हनुमान मंदिर, पोस्ट ऑफिस, सिद्धार्थ कॉलनी, झिंगणप्पा चौक मार्गे झिंगणप्पा मठ येथे पोहोचली. तेथे राणी व चंद्रकांत बावगे दाम्पत्यांच्या हस्ते शिवपिंडीची पूजा करण्यात आली. त्यानंतर महिलांनी शिवपिंडीवर दुधाचा अभिषेक केला.



डोक्यावर कलश घेऊन सहभागी झालेल्या महिलांमध्ये अनिता तिवारी, लता गायकवाड, अनुराधा गायकवाड, गायत्री मठपती, साधना माने, वर्षा पुदाले, बबीता स्वामी, अनिता बावगे, शांताबाई बावगे, चंद्रकला साळुंखे, मीना स्वामी, राणी बावगे, सुमन राऊत, ज्योती मेंगशेट्टी, निर्मला मीनशेट्टे, सुजाता स्वामी, कलावती बावगे, सोनाली बावगे, श्रीदेवी बावगे, अर्चना गायकवाड, सुवर्णा दाणे, कोमल पवार, लता पवार आदींचा समावेश होता. प्रभागाच्या नूतन नगरसेविका श्रावणी बालाजी झिपरे तसेच झिपरे परिवारानेही प्रमुख उपस्थिती दर्शविली.

चौदाघर मठ महिला भजनी मंडळाच्या वतीने हाती झेंडे व टाळ घेऊन सुशीला कलेमले, शिवगंगा कंगले, कुसुम पुदाले, शकुंतला बावगे, शिवकांता स्वामी, सुनिता स्वामी, मीना स्वामी, रेणुका स्वामी, ललिता बिडवे, शैला मठपती, जयश्री स्वामी, कविता स्वामी, दैवशाला हलके, छाया चिवटे आदींसह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

या मिरवणुकीत चौदाघर मठ देवस्थानचे विश्वस्त श्रीशैल्य सिद्धेश्वरे, दत्ता स्वामी बसपुरे, विजय स्वामी बसपुरे, शिवरुद्र कंगले, चंदू बावगे, मनमत बिडवे, सोमनाथ स्वामी, सोमनाथ बावगे, पुजारी दत्ता स्वामी, आकाश गवळी, पप्पू बोराळे, आकाश खुबा, वैभव चोळखणे, मनमत चोळखणे आदींसह अनेक पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आप्पा गणेश मंडळाचे युवक नागेश बावगे, मंदार प्रयाग, पृथ्वीराज चंदनगिरे, नागेश स्वामी, विजय मठपती, शिवम मठपती, प्रसाद बिडवे आणि अनेक बालगोपालांनीही कलश मिरवणुकीत सहभाग घेतला.

महाशिवरात्रीनिमित्त झालेल्या या भव्य आणि भक्तिमय सोहळ्यामुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ८८ शिक्षणक्रमांना ऑनलाईन प्रवेश घेण्यास दिनांक २८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

**नाशिक/प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत असलेल्या विविध ८८ शिक्षणक्रमांचे शैक्षणिक सत्र जानेवारी २०२६ करीता नवीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश घेण्यास येत्या दिनांक २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच जानेवारी २०२५ या सत्रात ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेला आहे; अशा विद्यार्थ्यांसाठी द्वितीय वर्षाचीही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. शासनाचे नवीन शैक्षणिक धोरण व विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार कृषी शिक्षणक्रम, बी. एड. (सेवांतर्गत), बी. एड. (विशेष) तसेच विज्ञान विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांव्यातिरिक्त उर्वरित सर्व शिक्षणक्रमांसाठी ही प्रवेश प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांना नियमित पदवी सोवत दूरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी विनाविलंब शुल्कासह घेता येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी दिली आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापनेपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. त्यातून अनेक विद्यार्थी प्रशासकीय व खाजगी संवेत उच्चपदावर कार्यरत आहेत. मानाची पदे भूषवत आहेत. हे विद्यापीठ सर्वसामान्य ते विशेष पारंगत अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रवेशद्वार ठरत आलेले आहे. येथे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तसेच वेब रेडिओ, दृकश्राव्य माध्यम व मोबाईलद्वारे देखील



मार्गदर्शन केले जाते. दोनवेळा आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित, दूरशिक्षण क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य यूजीसी मान्यताप्राप्त व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचलेले एकमेव मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठातर्फे सेनादल सैनिक, बंदीजन, कृषि सेवक, शेतमजूर आणि समाजातील इतरही घटक यांच्यासाठी विशेष शिक्षणक्रम आहेत. शिवाय ए.आय. डाटा सायन्स, सायबर क्ट ते बीए, बीकॉम, एम. ए., एम. कॉम., एम. लिब., एम. सी. ए. यासह विविध व आधुनिक कौशल्य विकासाचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. हे सर्व शिक्षणक्रम नोकरदारांना आपली नोकरी व व्यवसायिकांना आपला व्यवसाय सांभाळून पूर्ण करता येतात. त्यामुळे संबंधित इच्छुकांना आपले राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची व सर्वार्थाने प्रगती साधण्याची संधी उपलब्ध होत आहे.

त्या अनुषंगाने दिनांक २० जानेवारी २०२६ पासून विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत विविध ८८ शिक्षणक्रमांचे ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आले आहेत. त्यात प्रमाणपत्र – ३२, पदविका – ३०, पदवी – ११ व पदव्युत्तर १५ शिक्षणक्रमांचा समावेश आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे शुल्क देखील ऑनलाईन पद्धतीने भरून विद्यार्थ्यास प्रवेश अर्ज सादर करता येईल. प्रवेशासाठीची मुदतवाढ ही येत्या दिनांक २८ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या विहित मुदतीत विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटला भेट द्यावी. तेथे Admission या पर्यायावरून Prospectus येथे विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. काही तांत्रिक अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत (०२५३)२२३०५८०, २२३१७१५, २२३०१०६, २२३१७१४ या विद्यार्थी मदत केंद्रावरील दूरध्वनी क्रमांकावर किंवा ९३०७५७९८७४, ९३०७५६७१८२ अथवा ९२७२०४६७२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा आणि लवकरात लवकर प्रवेश घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे व विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले आहे.

## अक्षरनंदन व SGP इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील अक्षरनंदन प्राथमिक विद्यालय व SGP इंटरनॅशनल स्कूल, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी कातळे नगर येथील नंदादीप विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन जिल्हा परिषद सदस्या योगिता उमाकांत जाधव, माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा या वर्षीचे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. उमाकांत जाधव, गांधी चौक पोलीस स्टेशन वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्था सचिव कालिदास माने, अध्यक्ष भागवतराव माने, कोषाध्यक्ष सुरेखाताई माने, प्रकाश माने, प्रकाश जाधव, प्रशासकीय अधिकारी उषा आडे व नागोराव कांबळे मुख्याध्यापिका स्मिता भोसले उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर नूतन जिल्हा परिषद सदस्य योगिता उमाकांत जाधव, डॉक्टर उमाकांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव कालिदास माने यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका स्मिता भोसले यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश परळे, मीनाक्षी यादव व शिवकांत मुर्गे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातुरातील गुन्हेगारीवर नियंत्रण आणून नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा

## शहर जिल्हा भाजपाची निवेदनाद्वारे पोलिस अधिक्षकांकडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारी घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पहायला मिळत आहे. त्यातच सोमवार दि. १६ रोजी विद्यार्थ्याच्या हत्त्येची घटना घडली आहे. या घटनेमुळे पालक, विद्यार्थी यांच्यासह नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. याची दखल घेत लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने लातुरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणून नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे लातूर जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांच्याकडे करण्यात आली आहे.

लातूर शहरात सोमवार दि. १६ रोजी विद्यार्थ्याची दुर्देवी हत्या करण्यात आली आहे. ही घटना अतिशय गंभीर व संतापजनक आहे. गेल्या काही महिन्यापासून लातूर शहरात अनेक गुन्हेगारी घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे. याची दखल घेवून लातूर शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वात भाजपाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन दिले आहे.या निवेदनाच्या माध्यमातून विद्यार्थी हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कलमानुसार गुन्हे दाखल करावेत, या गुन्ह्याचा तपास जलदगतीने व पारदर्शक करून दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी प्रभावी पाठपुरावा करावा, शहरातील संवेदनशिल भागांमध्ये पोलिस बंदोबस्त वाढवून नियमित गस्त व प्रतिबंधक कारवाई करावी, गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यासाठी कोंबिग ऑपरेशन, शस्त्र तपासणी व संशयितांवर देखरेख वाढवावी. नागरिकांमध्ये विश्वास निर्माण व्हावा यासाठी कारवाईची अधिकृत माहिती वेळोवेळी जाहीर करावी व गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन, शाळा, महाविद्यालय, पालक व सामाजिक संस्थांच्या सहभागातून जनजागृती व प्रतिबंधात्मक मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



सदर निवेदन देताना मनपाचे गटनेते ॲड. दीपक मठपती, माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक प्रविण कस्तुरे, नगरसेविका रागिणी यादव, मडलाध्यक्ष सचिन सुरवसे, संतोष पांचाळ, संतोष तिवारी, मंदार कुलकर्णी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठी विधी अधिकारी नेमणुकीसाठी अर्ज मागवले

**लातूर/प्रतिनिधी :** शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (खंडित कालावधी) व सानुग्रह अनुदान योजनेतंर्गत न्यायालयीन प्रकरणांच्या कामकाजासाठी विधीज्ञ तथा विधी अधिकारी नेमण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच किंवा राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगात वकिलीचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. महाराष्ट्र/गोवा बार कौन्सिलच्या दरपत्रकानुसार जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचमधील प्रति केससाठी १० हजार रुपये आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील प्रति केससाठी ५० हजार रुपये मानधन दिले जाईल. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज djdalaturrediffmail.com या ई-मेल आयडीवर २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाठवावेत, असे लातूर विभागीय कृषी सहसंचालक, लातूर विभाग लातूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सैनिक कल्याण विभागात ७२ लिपिक-टंकलेखक पदांसाठी १४ मार्चला ऑनलाईन परीक्षा

**लातूर/प्रतिनिधी :** सैनिक कल्याण विभाग आणि त्याअंतर्गत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदांच्या एकूण ७२ रिक्त जागांसाठी टीसीएस-आयओएनमार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा १४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत घेतली जाईल. या पदांसाठी अर्ज केलेल्या लातूर जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी वरील नमूद वेळेत परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

## श्री केशवराज ज्युनिअर कॉलेजचे JEE MAINS-2026 परीक्षेत घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या गएए चरळपी २०२६ या परीक्षेमध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज ज्युनिअर कॉलेज, लातूर येथील विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले. यामध्ये महाविद्यालयातील चि. कृष्णा शाम कच्छवे ९९.६०टक्के, चि. ईशान शशिकांत मोगरेकर ९६.३१ टक्के, चि. हर्षवर्धन लक्ष्मणराव लोमटे ९५.६४ टक्के, चि.प्रसाद गजानन चव्हाण ९२.८९ टक्के चि.श्रीनिधी योगेश ताशी ९२ टक्के, चि.आशिष बालाजी कुलकर्णी ८७.६७ टक्के, चि.रोहन विनायक गोसावी ८६.६३ टक्के, चि रमण नवनाथ गुरले ८६ टक्के, चि.सार्थक धनंजय कुलकर्णी ८५.९० टक्के, गुण मिळविले आहेत.



या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, कॉलेजचे प्राचार्य बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, विभाग प्रमुख रेखा पुरी तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## मेस्को लातूर अंतर्गत सुरक्षा रक्षकांच्या अनेक रिक्त जागा; माजी सैनिक, पाल्य, पत्नी व विधवांनी २७ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत

**लातूर/प्रतिनिधी :** माजी सैनिक सहाय्यक योजना अंतर्गत मेस्कोच्या लातूर क्षेत्रीय कार्यालय येथे बीड आणि नांदेड जिल्ह्यांतील विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक पदांच्या रिक्त जागा उपलब्ध आहेत. या पदांसाठी माजी सैनिक, माजी सैनिकांचे पाल्य, माजी सैनिकांच्या पत्नी तसेच माजी सैनिकांच्या विधवा यांना प्राधान्याने संधी देण्यात येत आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी आपले अर्ज, सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मेस्को क्षेत्रीय कार्यालय, लातूर येथे स्वतः जाऊन कागदपत्रे जमा करून नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

# सौहार्द, समन्वय आणि जबाबदारीची नवी दिशाचा लातूर पॅटर्न, आगामी सण-उत्सव शांततेत साजरे करण्याचा निर्धार

## २०२६ पासून मोटार सायकल रॅली सर्वानुमते रद्द

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात आगामी महाशिवरात्री, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, रमजान ईद, श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर यात्रा, संत सेवालाल महाराज जयंती, होळी/रंगपंचमी आदी विविध जयंती, सण व उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक, लातूर यांनी दिनांक १३/०२/२०२६ रोजी सायं. ४.०० वा. पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे सर्व संबंधित मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शांतता समिती सदस्यांची व्यापक बैठक आयोजित केली होती.

बैठकीदरम्यान सर्व सण-उत्सव पारंपरिक पद्धतीने, शांततेत व परस्पर सामंजस्याने साजरे करण्याचे पोलीस प्रशासनातर्फे आवाहन करण्यात आले. विशेषत: शिवजन्मोत्सव समिती व ईद-ए-मिलादुन्नबी कमिटी यांच्या वतीने काढण्यात येणाऱ्या मोटार सायकल रॅलीच्या संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी दोन्ही समित्यांच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी परस्पर सहमतीने आणि सामाजिक सलोखा अबाधित राखण्याच्या दृष्टीने सन २०२६ पासून मोटार सायकल रॅली कायमस्वरूपी रद्द करण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला. शिवजन्मोत्सव मोटार सायकल रॅली समितीचे अध्यक्ष श्री. मनोज शिवाजी डोंगरे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीचे अध्यक्ष श्री. कलीम रजा कुरेशी, श्री. उमरदराज खान शफी काझी, श्री. यासीन कच्छी व श्री. सर्फराज मनियार यांनी मोटार सायकल रॅली बंद करण्याबाबतचे लेखी निवेदन पोलीस प्रशासनास सादर केले. पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले की, यापुढे कोणतीही मोटार सायकल रॅली विनापरवाना काढण्यात आल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी सण-उत्सव साजरे करताना नियमांचे पालन करावे, ध्वनीप्रदूषण, वाहतूक अडथळे व कोणत्याही प्रकारच्या उत्तेजक कृती टाळाव्यात, असे आवाहनही करण्यात आले.

सदर बैठकीस श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. समीरसिंह साळवे (लातूर शहर), श्री. गजानन भातलवंडे (उदगीर), श्री. आरविंद रायबोले (अहमदपूर), श्री. कुमार चौधरी (औसा), श्री. साहेबराव नरवाडे (लातूर ग्रामीण), श्री. विशाल ढुमे (निलंगा) उपस्थित होते.

तसेच लातूर शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी गांधी चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सुनिल रेजितवाड, शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. अभिषेक शिंदे, विवेकानंद चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. समाधान चवरे यांच्यासह विविध सण-उत्सव मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शांतता समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सण-उत्सव हे सामाजिक ऐक्य, बंधुता व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहेत. परस्पर आदर, संयम व सहकार्याच्या भावनेतून सर्वांनी शांतता राखून सण साजरे करावेत. लातूर पोलीस प्रशासन जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी कटिबद्ध असून नागरिकांच्या सहकार्यानेच सुरक्षित, शांत व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## लातूर जिल्ह्यात ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी अधिसूचना जारी; वर्षभरात मिळणार १५ दिवसांची सूट

**लातूर/प्रतिनिधी :** ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० नुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रांच्या वापराबाबत अधिसूचना जारी केली आहे. श्रोतगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांव्यतिरिक्त इतर ठिकाणी वर्षभरात १५ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक/ध्वनिवर्धक वापरण्याची सूट देण्यात आली आहे.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा १ दिवस, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा १ दिवस, श्रीगणेश उत्सव काळात पाचवा गौरी विसर्जन, सातवा, अनंत चतुर्दशीचा आदला दिवस व अनंत चतुर्दशी असे एकूण ४ दिवस, नवरात्र उत्सव काळात अष्टमी व नवमी असे २ दिवस, दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन व दिवाळी पाडवा असे २ दिवस, ईद-ए-मिलादचा १ दिवस, ख्रिसमसचा १ दिवस आणि ३१ डिसेंबररोजी १ दिवस असे १३ दिवस आणि उर्वरित २ दिवस ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक लातूर यांच्या शिफारसीनुसार जिल्ह्यातील महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने सूट देण्यात येणार आहे.

शांतता क्षेत्रासाठी ही सूट लागू राहणार नाही. अंमलबजावणीची जबाबदारी महानगरपालिका आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहील, असेही अधिसूचनेत नमूद आहे.

# जेईई मेन्स २०२६ च्या परीक्षेत आसावरी ज्योती अजित निंबाळकर हिचे घवघवीत यश



**निलंगा/प्रतिनिधी :** नॅशनल टेस्टिंग एजन्सी २०२६ मार्फत घेतलेल्या परीक्षे मध्ये निलंगयाची आसावरी ज्योती अजित निंबाळकर हिने घवघवीत यश प्राप्त करून निलंग्याचे नाव लौकिक केले आहे. तीने ह्या गएए च-खछड २०२६ च्या परीक्षे मध्ये ९९.२७% पर्सेंटाइल गुण मिळविले आहेत. येवढे गुण मिळवणारी ती निलंगा तालुक्याची पहिली मुलगी ठरली आहे. तर ३५० हून अधिक जाती असलेल्या ओबीसी प्रवर्गा मध्ये ती लातूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवणारी पहिली मुलगी ठरली आहे.

तिच्या ह्या यशाबद्दल वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर, सौ. अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर, काँग्रेस चे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, जिल्हा अध्यक्ष अभय साळुंके, काँग्रेस ओबीसी विभाग प्रदेश अध्यक्ष डॉ.प्रा.यशपाल भिंगे बारा बलुतेदार महासंघ राज्य अध्यक्ष कल्याण दळे, महाराष्ट्र अंनिस राज्य अध्यक्ष माधव बावगे व इतर मान्यवरांनी तसेच छत्रपती शाहू शिक्षण संस्थेने शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

निलंग्यातील निंबाळकर परिवार हा महाराष्ट्रातील एकाच कुटुंबातून मोठ्या प्रमाणात डॉक्टर्स, इंजिनीअर्स, नायधीश घडवणारा एकमेव परिवार आहे असे मानले जाते.आसावरी ज्योती अजित निंबाळकर हिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## शिवबा ..

अखर्वात दिव्यराजा
जन्मतो बावन्नखणी
आऊची कूससोनेरी
शिवनेरी खणखणी

शिवबा तव कहाणी
पोवाडे आणि गाणी
वाटते केवढी मधूर
साखरेचीजणूं गोणी

नीत कोरली स्मरणी
कथा ऐके बालपणी
अर्थ उलघडे नव्यांने
बुध्दी का तरीहीउणी

शिवगुण वर्णन करी
थकून गेली लेखणी
भाग्यांनी प्राप्त होय
शिव परंपरा देखणी

प्रयास करावाहोण्यां
शिवबा समान गुणी
स्वराज्यात जन्मलो
खरेचं आम्ही ऋणी


शिव चरित्र हे अमृत
भरले तुडूंब रांजणी
कृतार्थ सार्थ जीवन
शिवाराय अंतकरणी

शिव पाईक असे मी
छबी पहा मनदर्पणी
शिव प्रतिमा स्पष्टता
आदरे झुकेलंपापणी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# माऊली शैक्षणिक संकुलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील आंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल, लातूरचे स्नेहसंमेलन दि.१५/०२/२६ रविवार रोजी विश्व पॅलेस या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले.



या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मा. श्री चंद्रकांतजी साळुंके -'संचालक सरस्वती विद्यालय,लातूर' यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विश्व पॅलेसचे संचालक विश्वनाथ जी म्हेत्रे हे होते. मान्यवरांचे स्वागत कोषाध्यक्ष श्री. तानाजी बेवनाळे पाटील व प्रा. उमेश जी गिरवलकर यांच्या हस्ते संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव गंगाधर आरडले यांनी केले. या स्नेहसंमेलनात बालवाडी विभाग ते नववी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट अशी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या स्नेहसंमेलनात आदिवासी नृत्य ,बंगाली नृत्य, महाकाली रक्तबीज वध, या आकर्षक नृत्यांच्या सादरीकरणाने सर्व प्रेक्षक भारावून गेले. तसेच या स्नेहसंमेलनात नरसिम्हा हिरण्यकश्यपू वध हे नाट्यमय सादरीकरण उल्लेखनीय ठरले. स्नेहसंमेलनाच्या शेवटी 'ऑपरेशन सिंदूर' हे देशभक्तीपर नृत्य अंगावर शहारे आणणारे ठरले. या स्नेहसंमेलनासाठी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. कविता आरडले मॅडम,मुख्याध्यापक श्री प्रकाश तुगावे, श्री.रजनीकांत येरमे, श्री. प्रकाश राठोड, उपप्राचार्य श्री. राम दावणकर उपस्थित होते. स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी केले, व आभार विद्यालयाच्या उपप्रचार्या काळे भाग्यश्री यांनी मानले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे व संस्थेच्या सृजशशील उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले ,सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६